सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १११ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. २३ मे २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## भारत पाकिस्तानला आणखी एक दणका देण्याच्या तयारीत; FATF ग्रे लिस्टमध्ये येणार पाक...

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३नवी दिल्ली**

ऑपरेशन सिंदूर नंतर भारताने पाकिस्तान विरुद्ध आणखी एका मोठ्या कारवाईची तयारी केली आहे. पाकिस्तानला ग्रे लिस्टमध्ये टाकण्यासाठी भारत फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्स (ऋ-ढक्र) शी चर्चा करू शकतो. एफएटीएफ एक जागतिक संघटना असून, तिचे काम मनी लाँड्रिंग आणि दहशतवादासाठी आर्थिक मदतीवर लक्ष ठेवणे आहे.

पाकिस्तान हा दहशतवादाचा बालेकिल्ला आहे, गेल्या अनेक वर्षांपासून दहशतवाद्यांना निधी पुरवतो. त्यामुळेच त्याला अनेक वेळा ग्रे लिस्टमध्ये टाकण्यात आले आहे. दहशतवादी निधीसाठी जून २०१८ मध्ये ऋ-ढक्र ने पाकिस्तानला ग्रे लिस्टमध्ये टाकले होते, परंतु ऑक्टोबर २०२२ मध्ये ते ग्रे लिस्टमधून बाहेर काढले. त्यापूर्वी



२००८, २०१२ आण २०१५ मध्येही पाकिस्तानला ग्रे लिस्टमध्ये टाकले होते.

भारत जागतिक बँकेकडून पाकिस्तानला मिळणाऱ्या निधीलाही विरोध करू शकतो. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (खचत्र) ने अलीकडेच पाकिस्तानला १ अब्ज डॉलर्सचा निधी देण्यास मान्यता दिली आहे. भारताने यालाही कडाडून विरोध केला आहे.गेल्या महिन्यात २२ एप्रिल रोजी जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी गोळ्या झाडून २६ पर्यटकांना मारले होते. त्या घटनेनंतर भारत आणि पाकिस्तानमधील संबंध कमालीचे बिघडले आहेत. आता पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा जगासमोर आणण्यासाठी भारताने आपले शिष्टमंडळ तयार केले असून, ते विविध देशांमध्ये जाऊन पाकिस्तानची पोलखोल करणार आहेत. याशिवाय, पाकिस्तानला विविध जागतिक संघटनांकडून मिळणारी मदतही थांबवण्याचे प्रयत्न करत आहे.

## राज्यभरात मुसळधार पावसाची शक्यता; महावितरणकडून 'हाय अलर्ट' जारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३मुंबई :**

अरबी समुद्रावर कमी दाबाचे क्षेत्र तयार झाल्याने राज्यभरात पुढील तीन ते चार दिवस वादळ वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर महावितरणने यंत्रणेसाठी हाय अलर्ट जाहीर केला आहे. या कालावधीसह पावसाळ्यातील सुरळीत वीजपुरवठ्यासाठी आपत्कालिन नियोजन करण्यात आले आहे.

महावितरणचे अध्यक्ष लोकेश चंद्र यांनी राज्यातील वीजपुरवठ्याचा आढावा घेतला. नैसर्गिक आपत्तीमुळे खंडित झालेला वीजपुरवठा तातडीने सुरू करण्यास सर्वोच्च प्राधान्य द्यावे, मुख्यालय व परिमंडलस्तरावर २४७ आपत्कालिन व्यवस्थापन नियंत्रण कक्षाची लगेचच स्थापना करावी. कोणीही मुख्यालय सोडू



नये, असे निर्देश लोकेश चंद्र यांनी दिले. यंदा मान्सूनच्या आगमनापूर्वीच राज्यात वादळ वाऱ्यासह मुसळधार पावसाची दररोज हजेरी सुरू आहे. अरबी समुद्रावर कमी दाबाचे क्षेत्र सध्या स्थिर असले तरी त्याच्या प्रभावामुळे कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये वादळ वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता आहे. या परिस्थितीमध्ये सुरळीत वीजपुरवठ्याच्या उपाययोजनांसाठी ही बैठक झाली.

दरम्यान, शुक्रवारपासून मुख्यालय व राज्यातील आपत्कालिन व्यवस्थापन नियंत्रण कक्षांचे कामकाज सुरू झाले आहे. वीजपुरवठा खंडित झाल्यास तो तातडीने व वेळेत सुरू करण्यासाठी तात्काळ उपाययोजना कराव्यात. एखाद्या ठिकाणी दुरुस्ती कामाला वेळ लागणार असेल तर त्याबाबत संबंधित ग्राहकांना 'एसएमएस'द्वारे, व्हॉटस् ॲप ग्रुप्स, ट्वीटर व सोशल मिडिया, प्रसिद्धी माध्यमांद्वारे ताबडतोब कळविण्यात यावे.

खंडित वीजपुरवठ्याच्या कालावधीबाबत मुख्यालयाकडून पर्यवेक्षण करण्यात येत आहे. शक्य असूनही वीजपुरवठा वेळेत सुरू झाला नाही, तर त्याची गंभीर दखल घेण्यात येईल.सुरळीत वीजपुरवठ्यासाठी कोणत्याही प्रकारची हयगय खपवून घेतली जाणार नाही. त्यासाठी क्षेत्रीय वरिष्ठ अभियंत्यांनी मोठ्या व गंभीर बिघाडाच्या ठिकाणी स्वतः जाऊन दुरूस्ती कामांना वेग द्यावा.

वादळवारा व मुसळधार पावसामुळे वीजयंत्रणेचे नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रत्येक परिमंडल स्तरावर विजेचे खांब, रोहित्र, वीजतारा, ऑईलसह इतर यंत्रसामग्री उपलब्ध ठेवावी.पावसामुळे नादुरुस्त झालेल्या वीज यंत्रणेच्या दुरुस्तीसाठी संबंधित अभियंते, कर्मचाऱ्यांना तसेच सर्व एजन्सींना मनुष्यबळ, सामग्री व वाहनांसह युद्धपातळीवर तयार राहवे.

## २०१४ पूर्वी पाकिस्तानला योग्य उत्तर दिले नाही

### BSF च्या कार्यक्रमातून अमित शाहांचा हल्लाबोल



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३बिकानेर**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज(दि.२३) सीमा सुरक्षा दलाच्या (इडक्र) पदग्रहण समारंभात भाग घेतला. यावेळी त्यांनी भारतीय सैन्याचे कौतुक केले. तसेच, पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाचा उल्लेख करत तत्कालीन काँग्रेसच्या नेतृत्वातील युपीए सरकारवर टीकाही केली.

गृहमंत्री अमित शाह म्हणाले, ऑपरेशन सिंदूरची जगभरात चर्चा होतेय. यापूर्वी भारताने नेहमीच बचावात्मक प्रतिक्रिया दिली. पण, पहिल्यांदा भारताने पाकिस्तानात घुसून उरी दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर दिले. त्यानंतर बालाकोटमध्ये प्रवेश करुन उरीपेक्षाही कठोर उत्तर दिले. आताही ऑपरेशन सिंदूरद्वारे पाकिस्तानला त्यांच्याच भाषेत जोरदार प्रत्युत्तर देण्यात आले. मोदी सरकार सत्तेत येण्यापूर्वी पाकिस्तानला कधीही अशाप्रकारचे उत्तर देण्यात आले नव्हते, अशी प्रतिक्रिया शाहांनी दिली.

ऑपरेशन सिंदूर यशस्वी झाल्याचे वर्णन करताना अमित शाह म्हणाले की, भारतीय सैन्याने ७ मेच्या रात्री पाकिस्तानमध्ये घुसून अनेक दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. लष्कराला किंवा हवाई तळाला हात लावला नाही. आम्ही फक्त दहशतवादी तळांवर हल्ला केला. जगभरातील दहशतवाद हा पाकिस्तान पुरस्कृत आहे, हे पाकिस्तानने सिद्ध केले आहे. सैन्याने पाकिस्तानच्या आत १०० किलोमीटर घुसून ज्या पद्धतीने प्रत्युत्तर दिले, त्याबद्दल संपूर्ण देशाला भारतीय सैन्याचा अभिमान आहे. देशाचा असा विश्वास आहे की जोपर्यंत बीएसएफ आहे तोपर्यंत पाकिस्तानी सैन्य एक इंचही पुढे जाऊ शकत नाही, असेही शाह म्हणाले.

## अंदमानच्या समुद्रातील एअर स्पेस दोन दिवसांसाठी बंद

### भारत मिसाईल किंवा शस्त्रास्त्र प्रणालीची चाचणी करण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अंदमान**

पाकिस्तानची नांगी ठेचल्यानंतर आता भारत मोठी तयारी करत आहे. अंदमानच्या समुद्रातील एअर स्पेस दोन दिवसांसाठी बंद करण्यात येत असल्याचे जाहीर केले आहे. आज सकाळपासून ते २४ मेच्या सकाळी ७ वाजेपर्यंत ही हवाई क्षेत्राची बंदी राहणार आहे. नोटाम जारी केल्याने भारत कोणत्या मिसाईलची चाचणी करतोय याकडे जगाचे लक्ष लागले आहे. भारताच्या आकाश आणि ब्रम्होस मिसाईलनी पाकिस्तानात हाहाकार उडवून दिला होता. दहशतवादी तळ उध्वस्त करण्याबरोबरच पाकिस्तानचे ११ एअरबेसही उध्वस्त करण्यात आले होते. यामुळे पाकिस्तानची हवा निघाली होती. पाकिस्तानने भारतावर हल्ल्याचे प्रयत्न केले परंतू ते सर्व भारताच्या शक्तीशाली सुदर्शन चक्र हवाई सुरक्षा प्रणालीने फोल ठरविले होते.

आता भारताने जारी केलेल्या हवाई क्षेत्रातील बंदीचे



हे क्षेत्रफळ ५०० किमी एवढे विस्तारलेले आहे. तसेच सर्व उंचीवरील स्तरांवरील नागरी विमानांना बंदी घालण्यात आली आहे. यामुळे इथे भारत आज मिसाईल किंवा शस्त्रास्त्र प्रणालीची चाचणी करण्याची शक्यता आहे. नोटाम म्हणजे नोटीस टू एअरमेन असते. या काळात कोणतेही विमान या भागातून नेण्यास मनाई असते. तसेच जरी कोणी परवानगी मागितली तरीही ती दिली जात नाही. चाचणीदरम्यान कोणतीही हानी होऊ नये म्हणून संभाव्य धोक्यांबद्दल माहिती देणारी ही सूचना वैमानिकांना जारी केली जाते. यापूर्वीही असे नोटाम जारी करण्यात आले आहेत. परंतु, आताचा नोटाम चार दिवसांच्या पाकिस्तानविरोधातील युद्धामुळे जास्त चर्चेत येत आहे.

NOTAM चे स्थान आणि काही तपशील क्षेपणास्त्र किंवा शस्त्र प्रणाली चाचणीचे संकेत म्हणून समजले जाऊ शकतात. गेल्या वर्षी एप्रिलमध्ये अंदमानमध्ये हवेतून मारा करणाऱ्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली होती. तसेच मार्च २०२२ मध्ये ब्रह्मोस क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी करण्यात घेण्यात आली होती.

## भारत आत येऊन ठोकून गेला आणि तुम्ही...

### भर संसदेत पाकिस्तानी नेत्याने स्वत:च्याच सरकारची पोलखोल केली!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३लाहोर**

जम्मू काश्मीरच्या पहलगाम येथे फिरायला आलेल्या लोकांवर गोळीबार करून, त्यांची हत्या करण्यात आली. या हल्ल्यात २६ निष्पाप पर्यटकांचा मृत्यू झाला. या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर' करून पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांची तळे उद्धवस्त केली. भारताच्या



या कृतीने अस्वस्थ झालेल्या पाकिस्ताननेही आपल्या ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी भारतातील अनेक भागात हल्ला करण्याचा प्रयत्न केला, परंतु भारतीय संरक्षण यंत्रणेने सर्व हल्ले हाणून पाडले.

प्रत्युत्तरादाखल भारतानेही पाकिस्तानच्या ११ हवाई तळांना लक्ष्य केले आणि ते पूर्णपणे उद्धवस्त केले. पाकिस्तानने भारतीय लष्करी कारवाईला खोटे ठरवण्याचा प्रयत्न वारंवार केला असला तरी, भारताने याचे सर्व पुरावे सादर केले आहेत. या दरम्यान पाकिस्तानमधून असे अनेक व्हिडीओ समोर आले आहेत, ज्यात त्यांनी स्वतः हल्ल्याची कबुली दिली आहे.

आता देखील एका पाकिस्तानी नेत्याचा व्हिडीओ व्हायरल होत आहे, ज्यामध्ये त्याने स्वत:च्याच सरकारची कानउघडणी केली आहे. भारताच्या हल्ल्यांमुळे पाकिस्तानचे मोठे नुकसान झाले आहे. मात्र, पाकिस्तानी सरकार या सगळ्या गोष्टींवर पडदा टाकण्याचे काम करत आहे. आता संतप्त नागरिक आणि नेते पाकिस्तानी सरकारला खडे बोल सुनावत आहेत.

## अन्न व नागरी पुरवठा खाते पुन्हा भुजबळ यांच्याकडे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३नाशिक**

नुकतीच मंत्रिपदाची शपथ घेतलेले राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांना अखेर खात्याची जबाबदारी मिळाली आहे. शिंदे सरकारमध्ये त्यांच्याकडेच असलेले परंतू, मध्यंतरी धनंजय मुंडेंकडे फिरून आलेले आले आहे. छगन भुजबळ हे मंगळवारी मंत्रिपदाची शपथ घेतील असे सोमवारी सायंकाळी सांगण्यात आले होते. मुंडे यांच्याकडे अन्न व नागरी पुरवठा खाते होते. तेच खाते भुजबळ यांच्याकडे दिले जाईल असे कयास बांधले जात होते. हे खाते मुंडेंना राजिनामा द्यावा लागल्याने अजित पवारांकडे होते. राज्यात भाजप-शिंदेसेना आणि अजित पवार गटाचे सरकार आल्यानंतर डिसेंबर २०२४ मध्ये झालेल्या विस्तारावेळी भुजबळ यांना मंत्रिपदाची संधी देण्यात आली नव्हती. तेव्हापासून ते नाराज होते. आपली नाराजी त्यांनी अनेकदा बोलून दाखविली होती. भुजबळ हे अजित पवार गटातील एक मोठा ओबीसी चेहरा मानले जातात. यामुळेच येत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भुजबळांना जवळ करण्यात आले आहे.

## गडचिरोली पोलिसांची मोठी कारवाई, भामरागड जिल्ह्यात चार नक्षलींना कंठस्नान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३गडचिरोली**

गडचिरोली जिल्ह्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. या बातमीनुसार, भामरागड जिल्ह्यात गडचिरोली पोलिसांनी मोठी कारवाई करत ४ नक्षलींना चकमकीत ठार केले आहे. जवळपास चार तास चालेल्या या चकमकीत गडचिरोली पोलिसांनी २ पुरुष आणि २ महिला




नक्षलवाद्यांना ठार मारले आहे. माहितीनुसार, सध्या घटना स्थळावर सर्चिंग ऑपरेशन सुरु आहे. नव्याने उभारण्यात आलेल्या कवंडे पोलीस ठाण्यातील हद्दीतील ही घटना असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. कवंडे पोलीस ठाण्यातील हद्दीत नक्षलवादी असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी कारवाई केली असल्याची माहिती गडचिरोली पोलिसांनी दिली आहे.

मागच्या काही दिवसांपासून छत्तीसगडमध्ये नक्षलवाद्यांविरोधात मोहिम सक्रिय करण्यात आली आहे. त्यामुळे गडचिरोली पोलीस देखील अलर्ट मोडवर असून आज झालेल्या चकमकीत ४ नक्षलवादी पोलिसांनी ठार केले आहे. ज्यामध्ये दोन महिला आणि दोन पुरुषांचा समावेश आहे. माहितीनुसार, गडचिरोली पोलिसांनी काल रात्रीपासूनच नक्षलवाद्यांविरोधात कारवाई सुरु केली होती. तर आज गडचिरोली पोलिसांनी मोठी कारवाई करत ४ नक्षलवादी ठार करण्यात आले आहे.

## बीडमधील गुन्ह्यांची मालिका संपेना! पवनचक्की कंपनीच्या सुरक्षा रक्षाकडून गोळीबार, एक ठार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३बीड**

राज्यात बीड जिल्हा सध्या फक्त येथील गुन्हेगारी कृत्यांनीच चर्चेत आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचा निर्घृण खून करण्यात आला होता. या प्रकरणाची देशात चर्चा झाली. यानंतरही जिल्ह्यात गुन्हेगारीच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. यानंतर नुकतीच एक घटना उघडकीस आली आहे. पवनचक्की कंपनीच्या सुरक्षा रक्षकाने गोळीबार केला आहे. त्यामध्ये एकाचा मृत्यू झाल्याचं सांगण्यात येत आहे.

बीड जिल्ह्यातील लिंबा गणेश परिसरातील पवनचक्की कंपनीच्या सुरक्षा रक्षकाने गोळीबार केला आहे. त्यामध्ये एकाचा मृत्यू झाल्याचं सांगण्यात येत आहे. काही चोरट्यांकडून पवनचक्की परिसरात चोरीचा प्रयत्न करण्यात येत होता. त्यावेळी ही घटना घडली आहे. या चोरांवर कंपनीच्या सुरक्षा रक्षकाने गोळीबार केला आहे. या गोळीबारानंचर नेकनूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आहे.

दरम्यान गेल्या काही महिन्यांपासून बीड जिल्हा अगोदरच याच पवनचक्की प्रकल्पामुळे गाजत आहे. त्यात आला याच प्रकल्पामध्ये ही घटना घडली आहे. या परिसरामध्ये दोन चोरटे चोरीच्या उद्देशाने आले होते. त्यावेळी या पवनचक्की कंपनीच्या सुरक्षा रक्षकाने गोळीबार केला. यामध्ये एका चोरट्याला ही गोळी लागल्याने त्याचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

संपादकीय ......

# अवकाळीचा तडाखा

केरळमध्ये साधारणपणे एक जूनला पोहोचणारा नैर्ऋत्य पाऊस एक-दोन दिवसांतच तेथे पोहोचण्याची शक्यता आहे. यावेळी नेहमीपेक्षा मान्सून अगोदर येणार आहे. यंदाचा पाऊस दीर्घकालीन सरासरीच्या तुलनेत १०५ टक्के पडेल, असा अंदाज भारतीय हवामान विभागाने एप्रिलमध्येच व्यक्त केला होता. महाराष्ट्रात कोकणातील किनारी भाग, मराठवाडा व विदर्भातील काही भागांत सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडण्याची शक्यता आहे. अवकाळी पावसामुळे कांदा, बाजरी, आंबा या पिकांना चांगलाच तडाखा बसला आहे. पुण्यासारख्या सर्व सोयी-सुविधांनी युक्त असलेल्या शहरात पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी तुंबले आणि वाहतूक कोंडीमुळे नागरिकांची दैना झाली.

वळवाच्या पावसात काही मोटारी वाहून गेल्या, जाहिरात फलक कोसळले आणि रस्त्यांची अवस्था नद्यांसारखी झाली. मुंबईतही नालेसफाईची कामे योग्यप्रकारे झालेली नाहीत. तसेच ठिकठिकाणी रस्त्यांचे काँक्रिटीकरण सुरू असून ते काम मुदतीत पूर्ण न झाल्यास हा राडारोडा गटारात जाऊन पाणी तुंबण्याचा धोका असल्याचा इशारा सत्ताधारी पक्षातील नेतेच देत आहेत. मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाने केलेल्या पाहणीत दक्षिण मुंबईतील ९६ उपकरप्राप्त इमारती धोकादायक स्थितीत असल्याचे निदर्शनास आले आहे. पावसाळापूर्व सर्वेक्षण सुरू झाल्यापासून पहिल्यांदाच एकाच वेळी इतक्या मोठ्या संख्येने इमारती अतिधोकादायक स्थितीत आढळल्या आहेत. मुंबईतील या इमारतींमधील अंदाजे २५०० रहिवाशांना बाहेर काढून त्यांना संक्रमण शिबिरात स्थलांतरित करण्यात आले पाहिजे. अन्यथा मोठी जीवितहानी होऊ शकते.

दरवर्षी दोन-चार इमारती कोसळतात आणि नंतर संबंधित यंत्रणा काय करत होती, असा सवाल केला जातो. पण तोपर्यंत काहीजणांचा जीव गेलेला असतो. व्यवस्थित नियोजन केल्यास ही प्राणहानी टाळू शकते. मान्सूनच्या काळात एखादी आपत्ती निर्माण झाल्यास तिचा सामना करण्यासाठी प्रशासन सज्ज आहे. त्यादृष्टीने सर्वच यंत्रणांनी योग्य ती तयारी करावी. राज्यातील सर्व महापालिकांनी पूरस्थितीचा सामना करण्यासाठी आराखडा तयार करावा. संबंधित अधिकार्यांनी पावसामुळे निर्माण होणार्या संकटांना तत्काळ प्रतिसाद द्यावा, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्सूनपूर्व आढावा बैठकीत दिले आहेत. त्यांचे तत्परतेने पालन झाले पहिजे. पश्चिम महाराष्ट्रात यंदा ११० ते ११९ टक्के पावसाचा अंदाज आहे. त्यामुळे सांगली आणि कोल्हापूर महापालिकांनी विशेष तयारी ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत.गेल्या काही वर्षांमध्ये दरडी कोसळण्याच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत आहेत. काही वर्षांपूर्वी पुणे जिल्ह्यातील माळीण हे संपूर्ण गावच मातीखाली गाडले गेले. कोकणातील इर्शाळगडमध्ये मोठीच दुर्घटना घडली. पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावर दरडी कोसळून वाहतूकच खोळंबते. कोकण रेल्वेच्या मार्गातही अशाच प्रकारची बाधा येते. मुंबईत तर बर्याचदा पावसाळ्यात दरडी कोसळून त्यात गोरगरीब झोपडपट्टीवासीयांचे जीव जातात. म्हणूनच दरडप्रवण क्षेत्राचे नव्याने मॅपिंग करून, संबंधित जागी तातडीने सुरक्षात्मक उपाययोजना करण्याची गरज आहे. जलसंपदा विभागाने धरणांमधील पाण्याच्या विसर्गासाठी आंतरराज्य समन्वय ठेवण्याची गरज आहे.

अलमट्टी धरणाच्या उंचीतील वाढीचा वाद गेली काही वर्षे तापत असतो. २० वर्षांपूर्वी आलेल्या आणि त्यापुढील महापुरानंतर, या धरणाची उंची वाढता कामा नये, हा सूर तीव- बनू लागला. कृष्णा नदीवर विजापूर व बागलकोट जिल्ह्यात बांधलेल्या अलमट्टी धरणाची उंची ५ मीटरने वाढवून ती ५२४.२५ मीटर इतकी करण्याची कर्नाटक सरकारची योजना आहे. त्यामुळे सांगली, कोल्हापूर, सातारा जिल्ह्यांतील पुराची जोखीम वाढलेली आहे. महाराष्ट्र सरकारने या धरणाची पाणीपातळी ५१७.४ मीटर इतकी ठेवण्याची मागणी केली आहे. मात्र या मागणीस कर्नाटककडून प्रतिसाद मिळणे गरजचे आहे आणि त्याबाबत महायुती सरकारने केंद्राकडे जोर लावला पाहिजे.

अलमट्टीबाबत चर्चा करण्यासाठी जलसंपदा विभागाने सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन केले असून, खरे पाहता यासंदर्भात अगोदरच विचारविनिमय होण्याची गरज होती. राज्यातील आपत्तिप्रवण भागांचे अद्ययावत नकाशे हवाई दलास द्यावेत आणि महापालिकांनी रस्त्यांची कामे करताना, लावलेले अडथळे पावसाळ्यापूर्वी काढून टाकावेत, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी केल्या असून त्या महत्त्वाच्याच आहेत. यंदा पाऊसपाणी उत्तम राहणार असल्याने पेरणी आणि उत्पादनात विक्रमी वाढ होईल, असा अंदाज कृषी विभागाने व्यक्त केला आहे. १४४ लाख हेक्टरवर खरिपाच्या पेरण्यांचे उद्दिष्ट ठेवले आहे; तर २०४ लाख टन अन्नधान्य व गळीत धान्याचे लक्ष्य निश्चित केले आहे. सुदैवाने यावेळी राज्यात बियाण्यांची पुरेशी उपलब्धता असून, कोणत्याही प्रकारची टंचाई नाही. पण बोगस बियाण्यांची समस्या सुटलेली नाही. आगामी खरीप हंगामात खते व औषधांचे हितसंबंध निर्माण होणार नाहीत, याची काळजी घ्या.तरीही तसा प्रयत्न झाल्यास जीवनावश्यक वस्तू कायद्यानुसार कठोर कारवाई करा, असे आदेश मुख्यमंत्र्यांनी कृषी विभागाला दिले आहेत. पेरण्यांच्या अगोदर वेळेवर शेतकर्यांना पतपुरवठा होणे गरजेचे असते. सिबिल म्हणजे कर्ज परतफेडीचे मानांकन. हे मानांकन जास्त असेल, म्हणजेच कर्ज परतफेडीची क्षमता अधिक असेल, तरच बँका बळीराजाला कृषी कर्जे देतात. अन्यथा देण्याचे टाळतात. शेतकर्यांना 'सिबिल'ची अट न लावता कर्जवाटप करा. तसे न करणार्या बँकांवर एफआयआर दाखल केले जातील, असा दम देण्याची वेळ मुख्यमंत्र्यांवर यावेळीही आली आहे. मुंबई, ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, पनवेल, उल्हासनगर, अंबरनाथ व बदलापूर या शहरांचा पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी दोन नवी धरणे बांधण्याकरिता राज्य सरकारने परवानगी दिली आहे. ही धरणे वेळेत पूर्ण झाल्यास वाढत्या लोकसंख्येचा पाणी प्रश्न सुटू शकेल. हवामान बदलामुळे पाऊस कधी आणि किती कोसळेल, याचा नेम नसतो. पण योग्य त्या नियोजनात्मक उपाययोजना केल्यास पाऊस कमी पडो की जास्त, अडचणींची तीव्रता नक्कीच कमी होते.

# महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी केली नाल्यांची पाहणी

## नाल्यांमध्ये कोणीही कचरा टाकू नये- आयुक्त सचिन कलंत्रे



**विदर्भ प्रजासत्ताक ,दि.२३अमरावती-**

अमरावती शहरातील मुख्य मोठे नाले १८ व लहान नाले २२ आहेत. सध्या पावसाळ्यापुर्वी नाले सफाईचे कामे सुरु करण्यात आली आहे. दरवर्षी प्रमाणे पावसाळ्यापुर्वी नाले सफाईचे कामे मार्च महिन्यापासुन जेसीबी / पोकलेन मशीनद्वारे सुरु करण्यात आले आहे. आज दि.२२/०५/२०२५ रोजी काँग्रेस नगर, भूमिपुत्र कॉलनी, श्री अंबादेवी परिसर नाला, एच.वि.पी.एम. व कठोरा नाका रोड, जिजाऊ नगर नंबर दोन, परिसर येथील सुरू असलेले नाले सफाईचे कामे पाहण्याकरीता महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, नियंत्रण अधिकारी डॉ.अजय जाधव, उपअभियंता प्रमोद इंगोले, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, कनिष्ठ लिपिक शुभम पांडे, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक कुंदन हडाले, स्वास्थ निरीक्षक, मनपा कर्मचारी, सफाई कामगार उपस्थित होते. यावेळी नाले सफाई चे कामे पूर्ण करण्याचे निर्देश महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी दिले. शहरातील नाले सफाईचे काम हाती घेण्यात आले आहे. मनपा क्षेत्रीय कार्यालयांतर्गत लहान मोठे नाल्यांची सफाई करण्यासाठी अतिक्रमण विभागाने सुरुवात केली आहे, अशी माहिती नियंत्रण अधिकारी डॉ.अजय जाधव यांनी दिली. जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यामध्ये मान्सूनपूर्व पावसाला सुरुवात होते. पाऊस सुरू झाल्यास नाले सफाईचे काम करता येत नाही. त्यामुळे उन्हाळ्यातच ही कामे पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यातच ३१ मे पूर्वी शहरातील सर्व नाले साफ करण्याचे आदेश महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी अतिक्रमण विभाग व स्वच्छता विभागाला दिले होते. त्यानुसार अमरावती शहरातील लहान-मोठे नाले साफ करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. पावसाळ्यामध्ये शहरात पूरस्थिती निर्माण होऊ नये, म्हणून अतिक्रमण विभाग व स्वच्छता विभागाकडून दरवर्षी सर्व नाले स्वच्छ केले जातात. सदर परिसरात नालेसफाईला सुरूवात झाली आहे. सफाई पूर्ववींच आणि सफाई नंतरचे छायाचित्रही घेण्यात येत आहे. तसेच नालेसफाई व्यवस्थित होते की नाही? याची आपण स्वतः पाहणी करत आहेत, असे महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी सांगितले.आयुक्त सचिन कलंत्रे यांनी सर्व अमरावतीकर नागरिकांना आवाहन केले की, नाल्यात कोणीही कचरा टाकू नये. कचरा टाकल्यामुळे पाण्याच्या प्रवाहात अडचण निर्माण होवून पुरसदृश्य परिस्थिती निर्माण होवू शकते.




# खाली बसून जेवण्याचे फायदे

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक**

काही वर्षांआधी तुम्हाला आठवत असेल की, कुटुंब एकत्र राहत असताना सगळेजण खाली जमिनीवर बसून जेवण करत होते. पण आजकाल कुटुंब वेगळी झालीत आणि जास्तीत जास्त लोक टायनिंग टेबलवर बसून, सोफ्यावर बसून किंवा खुर्चीवर बसून जेवण करतात. हा एक लाइफस्टाईलचा भाग झाला आहे. पण अनेकांना हे माहीत नसतं की खाली मांडी घालून बसून जेवण्याचे शरीराला काय काय फायदे मिळतात. बरेच लोक लोक याकडे जुनी पद्धत म्हणून बघतात. पण याच्या फायद्यांकडे दुर्लक्ष करतात. तेच फायदे आज आम्ही सांगणार आहोत.

खाली बसून जेवण करण्याचे अनेक फायदे आहेत. सर्वात महत्वाचा फायदा म्हणजे पचनक्रिया सुधारते. जमिनीवर ताट असल्याने आपल्याला घास घेण्यासाठी सतत वाकावे लागते. यामुळे शरीराची हालचाल होऊन अन्न योग्य पद्धतीने पचतं. जमिनीवर बसून जेवल्यास वजन कमी करण्यात मदत होते. तसेच पोट सुटत नाही. अपचन, जळजळ असे पोटाचे विकारही होत नाहीत.

जेवायला मांडी घालून बसल्याने शरीराच्या नसांचा थकवा कमी होतो. डायनिंग टेबलवर बसण्याऐवजी जमिनीवर बसल्यास शरीरातील रक्तप्रवाह सुधारतो. शरीराची लवचिकता वाढते. आपण जेव्हा जमिनीवर बसून जेवत असतो, तेव्हा पाठीचा कणा ताठ राहतो. तसेच पोट, पाठ, खाद्यांची सतत हालचाल होत राहते.

**गरजेचं आहे तेवढंच जेवण होतं**

सुखासन किंवा मांडी घालून जमिनीवर बसणे आणि जेवण करणे यामुळे जास्त जेवण केल्यास योग्य प्रमाणात जेवण करता येतं. हा लठ्ठपणा कमी करण्यासाठी उत्तम उपाय मानला जातो. खाली बसून जेवल्याने जेवढे आवश्यक आहे, तेवढेच आपण अन्न ग्रहण करतो. त्यामुळे पचन तंत्र सुरळीत राहतं आणि लठ्ठपणा कमी करण्यास मदत होते. व्यक्तीचे वजन नियंत्रित राहते.

पाठीचा कणा ताठ व मजबूत होतो आणि पाठीच्या समस्या दूर होतात. तसेच खाली बसून जेवल्याने जेवणावर जास्त लक्ष असतं. मेंदू शांत राहतो. मेंदूला लवकर कळतं की, आपलं पोट भरलं आहे. खुर्चीवर बसून किंवा उभे असताना रक्तपुरवठा हा पायाकडे जात असतो. त्यामुळे पचन




तंत्र सुरळीत काम करीत नाही. याने अपचन, ऍसिडिटी व इतर रोगांना आमंत्रण दिल्या जातं.

**कॅलरीज कमी होतात**

जमिनीवर बसून जेवण हळूहळू करता येतं. यामुळे आपण कमी प्रमाणात खातो. हे शरीरासाठी चांगलं असतं. यामुळे अधिक कॅलरीचे सेवन होत नाही. अशात यामुळे तुम्हाला वजन कमी करण्यास मदत मिळते.

**गुडघे दुखीची समस्या दूर होते**

जमिनीवर बसून खाल्ल्याने नितंबाच्या जोड, गुडघे आणि घोटे लवचिक होतात. या लवचिकपणामुळे पुढे चालून उठण्या-बसण्यासाठी त्रास होत नाही. हाडांचे रोग, समस्या दूर राहतात.

**हृदय निरोगी राहतं**

मांडी घालून बसणं हे वेगवेगळ्या योगासनातील एक आसन आहे. या आसनामध्ये शरीर आरामदायी अवस्थेत असतं आणि तणाव दूर होतो. हृदय देखील स्वस्थ राहतं. बसून खाल्ल्याने शरीरामध्ये रक्ताभिसरण सहज होते. जमिनीवर बसून खाल्ल्याने माणूस उठताना आधार न घेता उठतो यामुळे शरीर मजबूत आणि लवचिक राहते.

# पिक उत्पादनात २५ ते ३० टक्के वाढ करायची असेल तर करा बीबीएफ तंत्राने पेरणी

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक**

अवर्षणप्रवण भागात शेती करताना पाऊस वेळेवर आणि प्रमाणात होईल याची खात्री देता येत नाही. त्यामुळे अशा भागात जलसंधारण व पाणी ताण कमी करणाऱ्या तंत्रज्ञानाचा अवलंब अत्यावश्यक असतो.

तसेच काही ठिकाणी अति प्रमाणात पाऊस होतो अशावेळी पाण्याचा निचरा होणे महत्वाचे आहे. यासाठी बीबीएफ म्हणजेच (रुंद वरंबा सरी) पद्धत ही शाश्वत उत्पादनाची दिशा दाखवते.

बीबीएफ म्हणजे काय?

बीबीएफ तंत्रज्ञान म्हणजे रुंद वरंबा आणि सरी पद्धतीने जमिनीची मशागत करून बियाण्याची पेरणी करणे. या पद्धतीत शेतात सुमारे ६० सेमी. रुंद वरंबा आणि ३० सेमी. सरी अशा रचनेने शेताची रचना केली जाते. ही रचना बीबीएफ यंत्राच्या मदतीने तयार होते.

या तंत्रज्ञानाची वैशिष्ट्ये

१) सोयाबीन, तूर, मुग, उडीद, कापूस, मका, हरभरा आदी पिकांसाठी उपयुक्त.

२) अवर्षणप्रवण क्षेत्रात प्रभावी उपयोग, कारण जलसंधारण सहज साधता येते.

३) अति पाऊस झाला तरी पाण्याचा निचरा होतो.

४) बियाणे, खते यात २०-२५% बचत, त्यामुळे निविष्ठा खर्च कमी.

५) २५ ते ३०% पर्यंत उत्पादनात वाढ.

तांत्रिक फायदे

१) उताराच्या आडवी पेरणीमुळे जलसंधारण सुधारते, माती व पाणी दोन्ही साठते.

२) पावसाचा खंड असला, तरी पाण्याच्या ताणाची तीव्रता कमी होते.

३) जास्त पाऊस झाल्यास अतिरिक्त पाणी सऱ्यांमधून वाहून जाते, झाडांना पाणी साचत नाही.

४) पिकाला भरपूर हवा आणि सूर्यप्रकाश मिळतो त्यामुळे रोपे जोमदार वाढतात.

५) आंतरमशागत व फवारणी

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष




शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

करणे सोपे तसेच ट्रॅक्टर किंवा फवारणी यंत्र वापरता येते.

६) मातीची धूप कमी होते आणि तिची भुसभुशीतता व सच्छिद्रता वाढते.

बीबीएफ हे एक शाश्वत, खर्चिक बचत करणारे, उत्पादनवाढीस पोषक आणि पर्जन्याधारित शेतीस पूरक असे अत्यंत उपयुक्त तंत्रज्ञान आहे.योग्य नियोजनाने याचा अवलंब केल्यास शेतकरी बांधवांना हवामान बदलाशी सामना करत उत्तम उत्पादन घेता येईल.

# पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

## १०७ सुशिक्षित बेरोजगारांची प्राथमिक निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती** ,जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रात नुकताच पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा (प्लेसमेंट ड्राईव्ह) उत्साहात पार पडला. या रोजगार मेळाव्याला उमेदवारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मेळाव्यात ऑनलाईन आणि ऑफलाईन अशा एकूण २१० उमेदवारांनी सहभाग नोंदवला. त्यापैकी १५६ उमेदवारांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून मुलाखती दिल्या. मुलाखती दिलेल्या उमेदवारांपैकी १०७ जणांची विविध पदांवर प्राथमिक निवड करण्यात आली.

सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर, राठी असोसिएटच्या संचिता राठी, भारत फायनान्सचे शुभम काकडे, कोअर प्रोजेक्टचे सचिन निचळे, स्पंदन फायनान्सच्या केयुरी देशमुख, जना फायनान्सचे अमोल भुजांडे, जाधव ग्रुप ऑफ कंपनीजचे चंद्रकांत वाघमारे आणि टेक्नोक्राफ्ट प्रायव्हेट लिमिटेडचे किरण काळे आदी उद्योजक उपस्थित होते. या मेळाव्यात सर्व खाजगी आस्थापनांच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहून उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातील पंकज कचरे, कृपा अर्गुलेवर, प्रवीण बंबोळे तसेच अधिकारी, कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# ११ वी प्रवेशाची वेबसाईट आणखी ३ दिवस बंदच राहणार, २६ मे पासून सुरू होणार; ३ जूनपर्यंत करा अर्ज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती-**

राज्यातील उच्च माध्यमिक बोर्डाकडून ११ वीच्या ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेचा गोंधळ संपता संपेना झालाय. शिक्षण संचालनालयाकडून अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेसाठी आता नवीन वेळापत्रक जाहीर करण्यात आलं आहे. त्यानुसार, अकरावीच्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन प्रवेश २६ मे पासून सुरू होणार असून पहिली फेरी प्रत्यक्षात तेव्हाच सुरू होईल. त्यामुळे, गेल्या २ दिवसांपासून ऑनलाईन प्रवेशासाठी धडपड करणारा विद्यार्थ्यांना आणखी ४ दिवस थांबावे लागणार आहे. २१ मे रोजी बुधवारी प्रत्यक्षात सुरू होणारी ऑनलाइन अकरावी (ररठ १२४'३२) प्रवेशाची प्रक्रिया वेबसाईट मधील तांत्रिक अडचणीमुळे सुरू होऊ शकली नाही. त्यानंतर, आता महाराष्ट्र शिक्षण महामंडळाकडून २६ में हो नवी तारीख देण्यात आली असून २६ मे ते ३ जूनपर्यंत विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रवेश घेता येईल.राज्य शिक्षण महामंडळाने दिलेल्या नव्या वेळापत्रकानुसार, २६ मे ते ३ जूनपर्यंत म्हणजे ९ दिवस ११ वी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू राहणार आहे. त्यानंतर, के जून रोजी पहिली जनरल मेरीट लिस्ट लागणार आहे. ६ ते ७तारखेपर्यंत विद्याथ्यर्थ्यांना



आपल्या हरकती नोंदवून तक्रार करता येईल. त्यानंतर, ८ जून रोजी अंतिम जनरल मेरीट लिस्ट जाहीर होईल.

## २६ मे पासून ऑनलाइन प्रवेश, नोंदणी

राज्यात शासनाची वेबसाईट सुरू होताच अनेक विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू झाल्यानंतर अडचणींचा सामना करावा लागला. त्यामुळे, आता ही प्रवेश प्रक्रियाच पुढे ढकलण्यात आली आहे. आताही प्रवेशप्रक्रिया सोमवारपासून म्हणजेच दिनांक २६ मे पासून सुरू होणार आहे. त्यानुसार विद्यांच्यर्थ्यांना २६ मे ते ३ जून दरम्यान आपल्या पसंतीचे कॉलेज क्रमांक निवडता येतील, त्यासोबतच संपूर्ण अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेचा अर्ज भरता येणार आहे. तर, अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची पहिली गुणवत्ता यादी १० जूनला जाहीर होईल, अशी माहिती महामंडळाकडून देण्यात आली आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. २३ मे २०२५

शहर/ग्रामिण


# पहिली ते बारावीचा अभ्यासक्रम बदलणार!

## यावर्षी पहिलीला नवीन अभ्यासक्रम, टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी होणार

## चार वर्षांनी बदलणार दहावी बारावीचा अभ्यासक्रम

सुधीर केने

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती–**

राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार तयार करण्यात आलेल्या नवीन अभ्यासक्रमाची अंमलबजावणी राज्यातील शाळांमध्ये टप्प्याटप्प्याने करण्यात येणार आहे. ज्या अभ्यासक्रमाकडे सर्व विद्यार्थ्यांचे व पालकांचे लक्ष लागून होते तो इयत्ता आठवी, दहावी व बारावीचा अभ्यासक्रम २०२८ २९ या शैक्षणिक वर्षापासून अर्थात चार वर्षांनी बदलणार आहे. नवीन शिक्षण धोरण अमलात आले तेव्हापासून अभ्यासक्रम हे निश्चित होते. शिक्षणा धोरणानुसार सीबीएसइ पॅटर्न प्रमाणे अभ्यासक्रम येणार याकडे सर्व पालक विद्याध्यांचे लक्ष लागून होते नव्या शिक्षण



घोरणाची अंमलबजावणी सुरू झालेली आहे त्यामुळे अभ्यासक्रम कधी बदलणार याची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. दरम्यान शालेय शिक्षण व क्रीडा विभागानेराज्यातील कोणत्या इयत्तेचा अभ्यासक्रम कधी बदलणार हे स्पष्ट केले आहे.

राज्यात यावर्षीपासून म्हणजे शैक्षणिक सत्र २०२५–२६ पासून नव्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी सुरू होत आहे. पहिल्याच वर्षी इयत्ता पहिलीचा अभ्यासक्रम बदलणार आहे. २०२६ २७ या शैक्षणिक सत्रात इयत्ता दुसरी, इयत्ता तिसरी, चौथी व सहावीचा अभ्यासक्रम बदलणार आहे. तसेच २०२७–२८ या शैक्षणिक सत्रात इयत्ता पाचवी, सातवी, नववी व अकरावीचा अभ्यासक्रम बदलणार आहे दहावी, या शैक्षणिक वर्षापासून अर्थात चार वर्षांनी बदलणार आहे. नवीन शिक्षण धोरण अमलात आले तेव्हापासून अभ्यासक्रम हे निश्चित होते.बारावीचे बोर्ड कायम राहणार का याबाबतही उत्सुकता शिगेला पोचली होती परंतु तूर्तास दहावी व बारावीचे बोर्ड कायम राहणार असल्याचे संकेत असून इयत्ता आठवी, दहावी व बारावीचा अभ्यासक्रम २०२८ २९ या शैक्षणिक सत्रात बदलणार आहे. याप्रमाणे राज्यात राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार तयार करण्यात आलेल्या नवीन अभ्यासक्रमाची अंमलबजावणी होणार आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार राज्य शैक्षणिक अभ्यासक्रम आराखडा तयार करण्यात आलेला आहे. केंद्राच्या पॅटर्न नुसार पाठ्यपुस्तकाची मांडणी व रचना राहणार असून त्यामुळे विद्यार्थी विविध बोर्डाच्या पुर्वपरीक्षेची तयारी उत्तम करू शकतील.

**गजानन मानकर** – कार्यगट सदस्य, म. रा. पाठयपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ, बालभारती, पुणे.–



# गुरुकुंजात तस्करांचा धुमाकूळ

## राष्ट्रसंतांच्या आश्रमातील चंदनाची झाडे कापली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३गुरुकुंज मोझरी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या गुरुकुंज आश्रमातील मध्यवर्ती कार्यालयाच्या परीसरातील चंदनाची झाडे कापून त्यातील गाभा–फळविण्याचा प्रकार गुरुवारी सकाळी निदर्शनास आला.

गुरुकुंज आश्रमातील चंदनाच्या झाडांना चंदन तस्करांनी लक्ष्य केले. आश्रम परिसरात सहा ते सात चंदनाच्या झाडांपैकी तीन झाडांना चंदन तस्करांनी आरी व कटरने कापले त्यातील एका झाडाला कटरच्या साहाय्याने कापून यातील गाभा काढून नेण्यात आला आहे. या प्रकरणी चंदन तस्करांचा शोध घेऊन गुन्हेगारांवर कारवाई करावी, अशी मागणी अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवामंडळाकडून करण्यात आली आहे.

अमरावती–नागपूर राष्ट्रीय महामार्गालगत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, यांनी स्थापलेला अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवामंडळ सेवाभावी संस्था व आश्रम असून या आश्रम परिसरात विविध प्रकारची

झाडे लावण्यात आली आहेत. त्यात सहा है सात चंदनाच्या झाडांचा समावेश आहे. त्यातीलच एका चंदनाच्या झाडाला तस्करांनी कटरमशीनने कापून त्यातील गाभा काढून नेण्यात आल्याचे गुरुवारी पहाटे पाच वाजताच्या सुमारास निदर्शनास आले.बुधवारी मध्यरात्री एक ते दीड वाजताच्या सुमारास चंदनाच्या झाडाला लक्ष करण्यात आलेले असावे, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.



### रात्रपाळीत सुरक्षा रक्षक

अज्ञात चंदन तस्करांनी ज्या ठिकाणी चंदनाची झाडे कापली, ते आश्रम परिसरातील मध्यवर्ती कार्यालयाजवळचे ठिकाण आहे. हाकेच्या अंतरावरच मुख्य प्रवेशद्वाराजवळ दोन सुरक्षारक्षक रात्रपाळीत तैनात करण्यात आले आहे. तरीसुद्धा त्यांना हुलकावणी देऊन तस्करांनी चोरीचे धाडस केले. चंदनाच्या झाडांची कत्तल करणारे दिवसा रेकी करून चंदनाची झाडे हेरून ठेवतात व रात्री झाडांना कापून त्यातील मुख्य गाभा काढून नेतात.गुरुकुंज आश्रम परिसरात लावलेल्या चंदनाच्या झाडांना कापून त्यातील गाभा काढून नेण्यात आला. याप्रकरणी अज्ञात चोरट्याचा शोध घेऊन कारवाई करण्यात यावी, याकरिता लवकरच तिवसा पोलीस व वन विभागात तक्रार देण्यात येईल.

– **जनार्दनपंथ बोथे**,(सरचिटणीस, अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवाश्रम



# अवकाळी पावसाने ५० गावांमधील पिकांचे नुकसान

## १६ गावांमध्ये घरांचे नुकसान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती–**अमरावती जिल्ह्यात अवकाळी पावसाचा कहर कमी होण्याचे चिन्ह दिसत नाही. बुधवारी संध्याकाळी शहरासह ८ तालुक्यांमध्ये झालेल्या या मुसळधार अवकाळी पावसाने जिल्ह्यातील ५० गावांचे शेती क्षेत्र उद्धवस्त केले आहे. या पावसामुळे सुमारे २५५.५ हेक्टर क्षेत्रातील ज्वारी, कांदा, भाज्या, तीळ, टरबूज, केळी, आंबा, संत्री, भुईमूग आणि इतर पिके बाधित झाली आहेत.

अवकाळी पाऊस घडकल्याने नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे, ज्यामध्ये जास्तीत जास्त १४ गावे अंजनगाव सुर्जी तालुक्यातील आहे. केळी, कांदा आणि ज्वारीचे मोठे नुकसान झाले आहे.




### १६ गावातील ९४ घरांचे नुकसान

या पावसामुळे जिल्ह्यातील १६ गावांमधील ९४ घरे कोसळली. यामध्ये अमरावती ४, धामणगाव रेल्वे १, धारणी ४, चिखलदरा ४, तिवसा १, नांदगाव खंडेश्वर २, दर्यापूर ६, भातकुली ४, अमरावती ९, मोर्शी ४ गावांचा समावेश आहेत. तिवसा १, चांदूर बाजार ८, चांदूर रेल्वे ५ आणि दर्यापूर येथील ६ गावांमधील पिकांचे नुकसान झाले आहे. यासोबतच धामणगाव रेल्वे, मोर्शी, धारणी येथे ११ गुरे मृत्युमुखी पडली आहेत.

# शेतजमिनीच्या ताब्यावरून आत्महत्येचा प्रयत्न

## खेल शिवारातील घटना, पोलिसात परस्परविरोधी तक्रारी

**विदर्भ प्रजासत्ताक, दि.२३अचलपूर**

तालुक्यातील खेल शिवारात शेतजमिनीच्या ताब्यावरून मोठा तणाव निर्माण झाला. यावेळी एकाने अंगावर पेट्रोल टाकून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना २१ मे रोजी घडली. याप्रकरणी परस्पर तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला.तालुक्यातील मौजा खेल शिवारात सर्वे क्रमांक ६४, क्षेत्रफळ ७.३४ हेक्टर या शेतजमिनीच्या ताब्यावरून हा वाद आहे. श्रीराम गौशाळा संस्थेचे अध्यक्ष राजेश राधेश्याम खंडेलवाल यांना महसूल विभागाच्या आदेशानुसार २१ मे २०२५ रोजी या जमिनीचा ताबा देण्याची कारवाई सुरू असताना विरोधकांच्या प्रतिकारामुळे तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. तहसील कार्यालयाचे मंडळ अधिकारी अमोल बोकडे हे तहसीलदार यांचे पत्रानुसार, कुळकायद्यानुसार ताबा देण्याची कार्यवाही मंडल अधिकारी, नायब तहसीलदार, तलाठी, तथा कोतवाल निखिल दांडगे आणि दोन पंच यांच्या उपस्थितीत पोलिस बंदोबस्तासह करीत होते. अर्जदार राजेश खंडेलवाल आणि त्यांचे सहकारी घटनास्थळी उपस्थित होते. त्याचवेळी गैरअर्जदार मनोहर शामराव पोकळे व त्यांच्या कुटुंबातील इतर सदस्यदेखील उपस्थित होते. ताबा देण्यास विरोध करताना मनोहर पोकळे यांनी कारवाई थांबवण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी समजावण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यानंतर दोन्ही पक्षांनी अचलपूर पोलीस ठाण्यातपरस्परविरोधी तक्रारी दाखल केल्या. वाढत्या तणावाच्या पोलीस निरीक्षकांनी पार्श्वभूमीवर अतिरिक्त बंदोबस्त मागवला. घटनास्थळी पोलीस व महसूल अधिकाऱ्यांनी विरोध करणाऱ्यांना बाजूला करून ताबा कार्यवाही केली. त्यावेळी मनोहर पोकळे यांनी पेट्रोलची बाटली काढून अंगावर ओतून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करत त्यांना अटक केली. त्यांच्यावर शासकीय कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला.

# सीपींनी केली जेल ची पाहणी, कडेकोट सुरक्षा ठेवण्याचे निर्देश

## कारागृहाचे बारकाईने निरीक्षण, मॉनिटरिंग रूमचीही तपासणी


**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती** –पोलिस आयुक्त अरविंद चावरीया यांनी गुरुवारी आयुक्तालयातील तिन्ही डीसीपी व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांसह जिल्हा मध्यवर्ती कारागृहाला भेट देऊन सुरक्षा व्यवस्थेची पाहणी केली. जेलच्या पहिल्याच व्हिजीटमध्ये सीपीचावरीयायांनी जेलच्या अंतर्गत व बाहेरील सुरक्षेची बारकवाईने पाहणी केली. तसेच मॉनिटरिंग सेलची तपासणी केली. कारागृहाची सखोल पाहणीकरून केवळसुरक्षा नव्हे तर तेथील सर्व व्यवस्था सुधारण्याचे निर्देश सीपी चावरीयांनी कारागृहाच्या अधीक्षक किर्तीचिंतामणी यांना दिले.



कारागृहात दाखल होताच सीपी चावरीया यांनी कारागृहातील कैद्यांची संख्या, कर्मचारी, सीसीटीव्ही आणि ड्यूटीच्या पद्धती याबाबत कारागृहातील अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली. त्यानंतर त्यांनी संपूर्ण जेल व परिसराच्या सुरक्षेचे लेखा परीक्षण केले. जेल अधीक्षक कीर्तिचिंतामणि आणिइतर अधिकाऱ्यांनी सीपी चावरिया यांना सर्व माहिती दिली.

आयुक्त चावरिया नुकतेच दोन दिवसांपूर्वी पदस्थ झाले आहेत. त्यांनी तीनही डीसीपी गणेश शिंदे, कल्पना बारवकर, सागर पाटील तसेच विशेष शाखा, गुप्तचर विभाग, महावितरण व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी आणि अभियंता यांना सोबत घेऊन कारागृह आणि परिसराची सखोल पाहणी केली. कैद्यांची संख्या, बरागची संख्या, सुरक्षा व्यवस्था, सीसीटीव्हींची संख्या आणि त्यांच्या स्थानांची तसेच मॉनिटरिंग रूमची तपासणी त्यांनी केली. पोलिस आयुक्तांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांपासून तेशिपायांपर्यंत थेट संवाद साधला.



कैद्यांच्या राहण्याच्या सुविधा, सुरक्षाव्यवस्थेबाबत माहिती घेतल्यानंतर प्रत्येकप्रहरात ड्युटी बदलण्याच्या पद्धतीबाबतही सीपींनी कारागृहातील अधिकाऱ्यांकडून माहिती मिळवली. त्यानंतर त्यांनी आपल्याअनुभवातून काही महत्त्वाचे निर्देश दिले. सीपी चावरिया यांनी कारागृहाच्या सुरक्षाव्यवस्थेलासर्वोच्च प्राधान्य देण्याचे स्पष्टपणे सांगितले.

# सोमवारी अमरावतीत '५२ सेकंद 'सावली होणार गायब

## दुपारी १२ ते १२.३० या दरम्यान ५२ सेकंदासाठी सोडणार आपली साथ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३अमरावती** : कोणी साथीला राहो न राहो सावली मात्र आयुष्यभर माणसाची साथ करते. असे नेहमी म्हटले जाते. मात्र ही सावली २५ मे रोजी दुपारी १२ ते १२.३० या दरम्यान ५२ सेकंदाकरिता आपली साथ सोडणार आहे. हा खगोलीय चमत्कार अमरावतीकरांना प्रत्यक्ष अनुभवाला मिळणार आहे. पृथ्वीवर मकर वृत्ताच्या दक्षिणेकडच्या भागात तर कर्कवृत्ताच्या उत्तरेकडच्या भागात सूर्य कधीच डोक्यावर येत नाही. तो सदैव उत्तरेकडे किवा दक्षिणेकडे दिसतो पण या दोन टोकाच्या वृत्तांमधल्या लोकांना मात्र वर्षातून दोनदा सूर्य बरोबर डोक्यावर आलेला अनुभवाला मिळतो. जेव्हा सूर्य डोक्यावर आलेला असतो तेव्हा आपली सावली सरळ आपल्या पायाखाली पडतेआणि जणू काही ती सावली गायब होते शून्य सावलीचा हा एक रोमांचकारी अनुभव आहे.खगोलप्रेमी अमरावतीकरांनी २५ मे रोजी दुपारी १२ ते १२.३० या दरम्यान ५२ सेकंदाकरिता आपली सावली गायब होण्याचा रोमांचकारी अनुभव प्रत्यक्षघ्यावा.असे आवाहान मराठी विज्ञान परिषद, अमरावती चे हौशी खगोल अभ्यासक विजय म. गिरुळकर व प्रविण गुल्हाने यांनी केले आहे. या घटनेविषयी अधिक माहिती पाहिजे असल्यास मो.नं. ९६३७३८४८१२ वर संपर्क साधावा.



# भारतविरोधी धोरणांना लक्षात घेऊन, तुर्कीयेसोबतचा सर्व कापूस व्यापार थांबवण्याचा निर्णय

## कॉटन असोसिएशन ऑफ इंडियाचा बहिष्कार, २०२४ मध्ये ७४. २७ दशलक्ष अमेरिकन डॉलर्सची आयात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती** – भारत–पाकिस्तान संघर्ष उफाळून आलेला असताना तुर्कीयेने (तुर्कस्तान) पाकिस्तानला पाठिबा दिल्यानंतर तुर्कीयेवर बहिष्कार घालण्याची मागणी जनतेमध्ये वाढत आहे, 'बॉयकॉट तुर्किये' या नावाने ही मोहिम सुरू झाली आहे, ज्यामध्ये तुर्कीयेमधून येणाऱ्या वस्तू, पर्यटन आणि इतर व्यवहारांवर बहिष्कार टाकायला सांगितले जात आहे. आता कापूस व्यापार देखील थांबवण्याचा निर्णय कॉटन असोसिएशन ऑफ इंडियाने (सीएआय) घेतला आहे

तुर्किए भारतातून कापूस आणि इतर साहित्य – आयात करते. २०२४ मध्ये, तुर्किएने भारतातून कापसासह एकूण ७४.२७ दशलक्ष अमेरिकन डॉलर्सची आयात केली होती, तर त्याच कालावधीत भारतातून निर्यात २.८४ अब्ज अमेरिकन डॉलर्सची झाली. जगातील सर्व देश त्यांचे व्यावसायिक भागीदार निवडताना स्वतःच्या हताला प्राधान्य देतात.

म्हणूनच, अलिकडच्या भू–राजकीय घडामोडी आणि तुर्कीच्या भारतविरोधी धोरणांना लक्षात घेऊन, तुर्कीयेसोबतचा सर्व कापूस व्यापार थांबवण्याचा विचार करावा आणि आमच्या राष्ट्राच्या हितासाठी आणि मजबूत आणि स्वावलंबी भारताला प्रोत्साहन देण्यासाठी पर्यायी पर्यायांचा शोध घ्यावा, असे आवाहन 'सीएआय'



चे अध्यक्ष अतुल गणात्रा यांनी पत्राद्वारे केले आहे.भारताच्या ऑपरेशन सिदूर दरम्यान, तुर्कीयेने भारतविरोधी भूमिका दाखवली आहे आणि भारताविरुद्ध उघडपणे पाकिस्तानची बाजू घेतली आहे. तुर्कीयेने पाकिस्तानला ड्रोन, इतर शखे आणि त्यांचे कार्यकर्ते पुरवून भारतीय नागरिक आणि लष्करी प्रतिष्ठानांवर अलिकडच्या हल्ल्यात मदत केली आहे आणि त्यांना प्रोत्साहन दिले आहे. यापूर्वीही, अनेक प्रसंगी, तुर्कीये यांनी संयुक्त राष्ट्र आणिइतर आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर काश्मीरचा मुद्दा उपस्थित केला आहे आणि आपल्या राष्ट्रीयहितांविरुद्ध काम केले आहे. तुर्कीयेदेशाच्या या कृती आपल्या राष्ट्राच्या सार्वभौमत्वाच्या आणि अखंडतेच्या विरोधात आहेत. म्हणूनच 'सीएआय'ने या देशासोबत कापूस व्यापार थांबवण्याचा निर्णय घेतल्याचे अतुल गणात्रा यांनी म्हटले आहे. या निर्णयामुळे तुर्कीयेला मोठा फटका बसण्याची शक्यता आहे.'बॉयकॉट तुर्कीये' या मोहिमेला आता वेग आला आहे. तुर्कीयेतून भारतात येणाऱ्या वस्तू तसेच फळांवरही बहिष्कार घालण्यात आला आहे. देशभरातील फळ व्यापाऱ्यांनी त्याला पाठिंबा दिला आहे. सुकामेवा व्यापाऱ्यांनीदेखील तुर्कस्तानमधून येणाऱ्या सुक्यामेव्यावर बहिष्कार घातला आहे. संपूर्ण देशात तुर्कीयेच्या उत्पादनांवर बहिष्कार टाकण्यात येत आहे. साधारणे पुण्यात दरवर्षी शंभर कोटीहून अधिक किमतीच्या सुक्यामेव्याची पुण्यात आयात केली जाते. सुकामेव्याच्या व्यापाऱ्यांकडून टाकण्यात आलेल्या बहिष्कारामुळे तुर्कस्तानवर मोठा आर्थिक परिणाम होणार असल्याचे चित्र आहे.

# विद्यापीठात सौर ऊर्जेद्वारे ६०% विद्युत निर्मिती: ६ वर्षांत ३ कोटीची बचत

## सौर ऊर्जा, ऊर्जा संवर्धन क्षेत्रात विद्यापीठाचे दिशादर्शक कार्य- कुलगुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने सोलर एनर्जी कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, दिल्ली या केंद्र शासनाच्या संस्थेमार्फत २०१८ मध्ये ५७६ किलो व्हॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प स्थापन केला असून सौर उर्जा व उर्जा संवर्धन क्षेत्रात विद्यापीठाचे कार्य दिशादर्शक असल्याचे मत कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी व्यक्त केले.

विद्यापीठाच्या एकूण वीज वापराच्या ५५ ते ६० टक्के वीज ही या प्रकल्पातून निर्मित होत असून ३.६२ रुपये प्रति युनिट वीज दर विद्यापीठासाठी निश्चित केला आहे. वीज वितरण कंपनीचा दर ११.५२ रुपये प्रति युनिट असून सौर प्रकल्पातून निर्मित होणारी वीज अतिशय स्वस्त दरात विद्यापीठाला मिळत आहे. मागील सहा वर्षात जवळपास तीन कोटी रुपयांची मोठी आर्थिक बचत झालेली आहे. याशिवाय निसर्ग संवर्धनासाठी सुद्धा विद्यापीठाने हातभार लावलेला असून सौर ऊर्जा प्रकल्पामुळे ४०८१ टन एवढ्या कार्बन-डाय-ऑक्साइडचे उत्सर्जन नियंत्रित झाले आहे.

मागील सहा वर्षात वीज बचत करणारे बीएलडीसी सिलिंग पंखे, एलईडी ट्यूबलाइट आणि पथदिवे, पंचतारांकित यंत्रे व उपकरणे यांचा वापर विद्यापीठाने वाढवलेला असून त्यामुळे मोठ्या प्रमाणात वीज बचत झाली आहे. विद्यापीठाचा एकूण वीज वापर १४.६४ लाख युनिट वरून २०२४-२५ मध्ये



तो १३.५७ लाख युनिट झाला आहे. मागील सहा वर्षांत इमारतींच्या, यंत्रे व उपकरणांच्या तसेच सभा व कार्यक्रमांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असतानाही विद्यापीठाची वीज वापरात घट उल्लेखनीय आहे.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या नेतृत्वाखाली आणि प्र-कुलगुरु डॉ.महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विविध प्राधिकारीणीच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाचे कार्यकारी अभियंता शशिकांत रोडे, उपअभियंता राजेश एडले, कनिष्ठ अभियंता आकाश सोळंके व अभियांत्रिकी विभागातील सर्वच कर्मचाऱ्यांचे प्रयत्न फलदायी ठरले आहेत. विद्यापीठात ८१ टक्के एलईडी लाइट्सचा वापर विद्यापीठातील एकूण राईट्स पैकी ८१ टक्के एलईडी लाईट असून ५० टक्के बीएलडीसी सिलिंग पंखे बसविण्यात आले आहेत. १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी निधी मिळण्याकरिता वित्तीय संस्थांकडे विद्यापीठाने प्रस्ताव सादर केला असून सीएसआर फंडासाठी प्रयत्न सुरू आहेत. विद्यापीठाला महाऊर्जाकडून वीज बचत करणारे एलईडी लाईट, बीएलडीसी सिलींग पंखे, पंचतारांकित वातानुकूलन यंत्रे लावण्यासाठी आतापर्यंत दोन टप्प्यांत ४४ लाख रुपयांचे वित्तीय साहाय्य प्राप्त झालेले आहे. विद्यापीठ परिसरातील निवासी इमारतींवर जवळपास २० हजार लिटर क्षमतेचे सौर बंब बसवण्यात आले.

# नांदगाव पेठ सहकारी संस्थेच्या निवडणुकीत शेतकरी आघाडी एकता पॅनलचा दणदणीत विजय



### सर्व संचालक मंडळ बिनविरोध

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३नांदगाव पेठ-** येथील विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या. र. नं. ०१ ची २०२५ ते २०३० या पंचवार्षिक कालावधीसाठीची निवडणूक शेतकरी आघाडी एकता पॅनलच्या नेतृत्वाखाली अत्यंत शांततापूर्ण आणि उत्साही वातावरणात बिनविरोध पार पडली. या ऐतिहासिक विजयामुळे एकता पॅनलने सहकार क्षेत्रात आपला लौकिक निर्माण केला आहे.ज्येष्ठ सहकार नेते शिवराजसिंह राठोड व माजी उपसभापती बाळासाहेब उर्फ सुनील देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवडणूक एकात्मतेच्या वातावरणात पार पडली. यावेळी अभयकुमारसिंह मानसिंह चंदेल यांची अध्यक्षपदी तर सै. मुज्जफर सै. खुबनमिया यांची उपाध्यक्षपदी एकमताने निवड झाली. संचालक मंडळावर बिनविरोध निवड झालेल्या सभासदांमध्ये साहेबराव ऊर्फ छत्रपती व्यंकटराव पटके, विजय देवीदासराव राऊत, आनंद गोवींदराव लोहोटे, राजेंद्र नामदेवराव कापडे, शेख अब्दुल सईद शेख रहेमान, किशोर मुरलीधरराव नागापुरे, गोविंद विठ्ठलराव तायवाडे, सै. महेफुज सै. मुसामिया, सुरेश शामरावजी पकडे, हर्षा मंगेशराव देशमुख आणि विजया नामदेवराव शिरभाते यांचा समावेश आहे. या विजयामुळे नांदगाव पेठ येथील सहकारी चळवळीला नवा जोम मिळाला असून, आगामी काळात संस्थेच्या कारभारात पारदर्शकता, जबाबदारी आणि शेतकऱ्यांच्या हिताचा केंद्रबिंदू राहील, अशी अपेक्षा स्थानिक नागरिकांकडून व्यक्त होत आहे.शेतकऱ्यांच्या हितासाठी आपण प्रभावीपणे तसेच पारदर्शकपणा ठेवून कामे करू असा आशावाद नवनियुक्त अध्यक्ष अभयसिंह चंदेल यांनी यावेळी व्यक्त केला.सर्व विजयी उमेदवारांचे गावकऱ्यांच्या तसेच शेतकऱ्यांच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे.-

# आमदार संजय गायकवाडांच्या लक्षवेधीनंतर बुलढाणाच्या पोलीस अधीक्षकांची आठ महिन्यातच उचलबांगडी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३बुलढाणा:**

बुलढाणा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक विश्व पानसरे यांची बदली करण्यात आली आहे. केवळ आठ महिन्यातच पानसरे यांची बुलढाणा येथून बदली झाल्याने जिल्हा पोलीस दलात खळबळ उडाली आहे. तसेच पोलीस दलात उलट सुलट चर्चेला उधाण आले आहे. विश्व पानसरे यांच्या जागी जिल्ह्याचे नवीन पोलीस अधीक्षक म्हणून आता नीलेश तांबे त्यांना जबाबदारी सोपवण्यात आली आहे. यामुळे बुलढाणा जिल्ह्याला दीर्घ काळानंतर भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी मिळाला आहे.



गुरुवारी गृह मंत्रालयाने बदल्यांचे आदेश निर्गमित केले आहे. जेमतेम आठ महिन्यात पोलीस अधीक्षक पानसरे यांची झालेली बदली चर्चेचा विषय ठरली आहे. विशेष म्हणजे, त्यांची बदली दुय्यम शाखेत करण्यात आली आहे. त्यांची अमरावती येथील राज्य राखीव दल गट क्रमांक ९ येथे समूपदेशक म्हणून झाली आहे. पोलीस विभागच नव्हे राजकीय वर्तुळात देखील या बदलीची चर्चा आहे.

१३ ऑगस्ट २०२४ रोजी विश्व पानसरे यांची बुलढाणा जिल्हा पोलीस अधीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. मात्र अवघ्या ८ महिन्यांच्या कार्यकाळानंतर त्यांची बदली करण्यात आली आहे.

त्यांचा बुलढाणा जिल्ह्यातील कार्यकाळ वाढत्या गुन्हेगारीने आणि समिश्र कामगिरीने चर्चेत राहिला. बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी जिल्ह्याच्या वाढत्या गुन्हेगारीवर विधानसभेत लक्षवेधी लावत पोलीस दलाचे वाभाडे काढले. यामुळे देखील खळबळ उडाली होती. दरम्यान बुलढाण्यात बदलून येत असलेले नूतन पोलीस अधीक्षक नीलेश तांबे हे २०१८ च्या बॅचचे आयपीएस अधिकारी आहेत. नंदुरबार येथे त्यांनी अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून काम पाहिले आहे. त्यानंतर नागपूर येथे गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस अधीक्षक म्हणूनही त्यांची कारकीर्द वाखाणण्याजोगी राहिली आहे. कृष्णप्रकाश यांच्यानंतर बुलढाणा जिल्ह्याला पहिल्यांदाच भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी एसपी म्हणून मिळाले आहेत.

# खा. बळवंत वानखडे यांची शिवसेना शिष्टमंडळाने घेतली भेट

## तालुक्यातील महत्त्वाच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३नांदगाव पेठ**

अमरावती तालुका (उबाठा) शिवसेनेच्या शिष्टमंडळाने आज खासदार बळवंत वानखडे यांची त्यांच्या अमरावती येथील कार्यालयात भेट घेतली. या भेटीत तालुक्यातील विविध प्रलंबित आणि ज्वलंत समस्या मांडून त्यावर त्वरित कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली. पिंपळविहीर येथील राष्ट्रीय महामार्गावरील अपूर्ण अंडरपास व त्यालगतचा सेवा रस्ता (सर्विस रोड) याबाबत शिष्टमंडळाने चर्चा केली. सदर ठिकाणी वारंवार अपघात घडत असल्याने अंडरपास पूर्ण करणे व सेवा रस्ता तातडीने तयार करणे आवश्यक असल्याची मागणी करण्यात आली.यासोबतच यावली शहीद



येथील सभागृहाच्या कामास गती देण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. तसेच नांदगाव पेठ ते माहुली, जहागीर, लेहगाव, मोर्शी, वरुड या मार्गावरील सिमेंट कॉंक्रीट रस्त्यांची झालेली दुर्दशा, रस्त्यावर पडलेल्या मोठमोठ्या भेगा व खड्ड्यांमुळे वाहनधारकांना त्रास होतोय, शिवाय अपघाताचे प्रमाण देखील वाढले आहे. संबंधित राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला रस्त्यांची त्वरित दुरुस्ती करण्याच्या सूचना देण्याची मागणी करण्यात आली. तसेच नियमबाह्य सुरू असलेल्या टोल वसुलीबाबतही शिष्टमंडळाने नाराजी व्यक्त करून टोल बंद करण्याची मागणी केली. या चर्चेच्या वेळी खासदार बळवंतराव वानखडे यांनी या सर्व मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेत कार्यवाहीचे आश्वासन दिले.या शिष्टमंडळात शिवसेना तालुकाप्रमुख व माजी जिल्हा परिषद सदस्य नितीन हटवार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती भैय्यासाहेब निर्मळ, शिवसेना उपजिल्हाप्रमुख राजेश बंड, उपतालुकाप्रमुख व यवली ग्रामपंचायत सदस्य अविनाश वानखडे, युवासेना उपजिल्हाप्रमुख शिवाजी चौधरी, ज्येष्ठ शिवसैनिक अरुण ठाकरे इत्यादींचा समावेश होता.शिवसेनेच्या शिष्टमंडळाकडून करण्यात आलेली ही कार्यवाही तालुक्याच्या विकासासाठी निश्चितच महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची माणिक मोती कंपनीत निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती** – पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय, अमरावती येथील पाच विद्यार्थ्यांची माणिक मोती या कंपनीत निवड झाली आहे. ही महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब असून त्याबद्दल सर्वत्र आनंद व्यक्त करण्यात येत आहे. या विद्यार्थ्यांची निवड कठीण निवड प्रक्रियेमार्फत झाली असून त्यामध्ये तांत्रिक मुलाखत व मानव संसाधन मुलाखतीचा समावेश होता. श्रुती मिसळे, मोहन ढोबळे, रसिका पचाडे, यश वाडी व प्रशिक चिचखेडे या विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानासोबतच संवाद कौशल्य व इतर गुणांच्या आधारे मोठी संधी प्राप्त केली. माणिक



मोती ही कृषी क्षेत्रातील अग्रगण्य सेवा पुरवणारी कंपनी असून कृषी क्षेत्रात या कंपनीचा मोठा वाटा आहे. महाविद्यालयातील ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलने विद्यार्थ्यांना या संधीसाठी योग्य मार्गदर्शन केले तसेच कौशल्य चाचणीची तयारी करून घेतल्याने विद्यार्थ्यांना सहजच यश प्राप्त करता आले. पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपचे संचालक डॉ. पी. एम. खोडके, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल ठाकरे, उपप्राचार्य नितेश चौधरी, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी प्राध्यापक डॉ, अर्चना त्रिपाठी व इतर प्राध्यापकांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

# संजय खोडके राष्ट्रवादीचे महासचिव नियुक्त सहा जिल्ह्याच्या समन्वयक पदाची जबाबदारी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती-** राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या अजित पवार गटात चांगला प्रभाव असलेले आमदार संजय खोडके यांची आणि प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी प्रदेश सरचिटणीसपदी नियुक्ती केली आहे आणि त्यांना ६ जिल्ह्यांचे समन्वयक म्हणूनही नियुक्त केले आहे.

या नियुक्तीने आमदार संजय खोडके यांचे पक्षात स्थान वाढले आहे. संजय खोडके यांची सरचिटणीसपदी नियुक्ती करण्याच्या घोषणेसोबतच, प्रदेशाध्यक्ष तटकरे यांनी त्यांना अमरावती विभागातील अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ तसेच वर्धा जिल्ह्याचे निमंत्रक म्हणूनही नियुक्त केले आहे. संबंधित जिल्ह्यांमधील पक्षाचे जवळजवळ सर्व



निर्णय आमदार खोडके यांच्या संमतीने घेतले जातील. राज्यात दोन महिन्यांत स्थानिक स्वराज्य महत्त्वाच्या संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या उमेदवारीपासून ते ६ जिल्ह्यांच्या महापालिका, जिल्हा र परिषदा, नगरपालिका, पंचायत समिती,नगरपंचायत आणि सर्व संस्थांच्या निवडणुकांमध्ये युती करणे किंवा न करणे, सर्व निर्णय आमदार खोडके घेतील. प्रदेशाध्यक्षांनी त्याची घोषणा केली. प्रदेशाध्यक्षांनी आमदार संजय खोडके यांना समन्वयक म्हणून नियुक्त करून पक्षाची सर्व जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

# तिवसा येथे शासकीय ज्वारी खरेदीचा शुभारंभ

## आमदार राजेश वानखडे यांच्या हस्ते उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती-**डॉ. भा. पं. देशमुख खरेदी विक्री समिती, तिवसा अंतर्गत राज्य शासनामार्फत शासकीय ज्वारी खरेदीचा शुभारंभ गुरुवार दि.२२ मे रोजी सकाळी कृषी उत्पन्न बाजार समिती, तिवसा येथे आमदार राजेश वानखडे तसेच खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष सुरेश मेटकर, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती रवी 'राऊत, नायब तहसीलदार अशोक काळिवकर यांच्या उपस्थितीत करण्यात आला.शासकीय हमी भावात धान्य खरेदी शुभारंभाप्रसंगी आमदार राजेश




वानखडे यांनी तिवसा येथील प्रगतशील शेतकरी संजय देशमूख यांची ज्वारी प्रतिक्विंटल ३,२८० रुपये दराने शासकीय हमी भावात खरेदी केली तसेच शाल व श्रीफळ देऊन त्यांच्या सत्कार करण्यात आला. यावेळी अतुल देशमुख, दत्ता माळोदे, श्रीधर वानखडे, सचिन सोटे संचालक, प्रवीण बायस्कर, प्रवीण साबळे, संचालक, राजाभाऊ थोरात संचालक, सुधीर गोंडसे अध्यक्ष तिवसा विविध कार्यकारी सोसायटी, प्रदीप गौरखेडे, सागर शिंगाने, अजय गुल्हाने, पुरुषोत्तम मुंदडा, मुकुंदराव आमले, विक्रम जोशी, सुधीर वानखडे, विजय देशमुख, रमेश सावंत, राहुल थोटे, प्रवीण बडकस, सागर बोडखे, अनिल थूल, प्रकाश पडोळे, राजाभाऊ टेकाडे सचिन राऊत, प्रवीण केने, बादल पाळेकर, वेतन काळे, अंकुश देशमुख, सुमित अनासने, अनिकेत वानखडे, सचिन राऊत इत्यादी तालुक्यातील शेतकरी व सर्वपक्षीय पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# वरूड न.प. विद्युत अभियंत्यासह एकाला लाच घेताना पकडले

## विद्युत खांब हटविण्याच्या बिलातून मागितले दीड लाख

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३वरुड-** वरुड नगर परिषदेच्या विद्युत अभियंत्याने बांधकाम होत असलेल्या रस्त्यावरील विद्युत खांब काढण्यासाठी देयकामध्ये २५ टक्के कमिशन एकूण अडीच लाख रूपये मागणी केली होती. लाचलुचपत विभागाच्या पथकाने मिळालेल्या तक्रारीवरून गुरुवारी दुपारी सापळा विद्युत अभियंत्यासह एका खासगी इसमास दीड लाख रुपयांचीलाच घेताना रंगेहात पकडले.

महेश मुरलीधर दुपारे (३८) असे कारवाई करण्यात आलेल्या विद्युत अभियत्यावे नाव आहे. तो नगरपरिषदेमध्ये कार्यरत आहे. तक्रारदार हे इलेक्ट्रीकल कॉन्ट्रक्टर असून त्यांच्याकडे एम.एस.ई.डी. सी. एल. वे काम करण्याचे लायसन्स आहे वरूडनगर परिषदेमध्ये नवीन रस्त्याचे काम चालू असून त्या रस्त्याव्या कामात अडथळा येणारे इलेक्ट्रीक खांब व डी. पी. हटविण्याचे काम तक्रारदार यांना मिळाले होते. मार्केट अशी दोन कामे चालू असून त्यातील झालेल्या कामाचे लाख रुपये व २ लाख ५० हजार रुपये कामाचे बिल त्यांनी नगरपरिषद, वरूड येथे सादर केले होते. सदरचे कामाचे मोजमाप पुस्तिका मंजूर करून कामाचे बिल मंजुरीकरिता लेखा शाखेत पाठविण्याकरिता यातील विद्युत अभियंता महेश मुरलीधर दुपारे याने तक्रारदार यांच्याकडे एकूण बिल रकमेच्या २५ टक्केलाचेची मागणी केली. याबाबत तक्रारदार यांनी १९ मे रोजी लाचलुचपत विभागाला तक्रार दिली होती सदर तक्रारीवरुन २० मे रोजी शासकीय पंचासमक्ष पडताळणीमध्ये आरोपी महेश दुपारे यानी वरील नमूद बिलांचे कामाचे मोजमाप पुस्तिका मंजुर करून कामाचे बिल मंजुरीकरिता लेखाशाखेत पाठविण्याकरिता २ लाख ५० हजार रुपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती लाता ५० हजार रूपये लाच रक्कम स्वीकारण्याची संमती दर्शविली.

गुरुवार २२ मे रोजी शासकीय पंचासमक्ष आयोजित करण्यात आलेल्या सापळा कारवाईदरम्यान आरोपी महेश दुपारे याने लाचेची रक्कम खाजगी इसम शरद ज्ञानेश्वर बेलसरे याला घेण्यास सांगितले त्याप्रमाणे शरद बेलसरे याने ती रक्कम कार्यालयात स्वीकारताना दोघांनाही ताब्यात घेण्यात आले. आरोपीविरुद पोलिस स्टेशन वरुड येथे गुन्हा नोंदवण्यात आला.ही कार्यवाही पोलिस अधीक्षक, ॲन्टी करप्शन परिक्षेत्र, अमरावती मारुती जगताप, पोलिस उपअधीक्षक अभय आष्टेकर याच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक भारत जाधव, केतन मांजरे, पोलिस अंमलदार उपेंद्र थोरात, वैभव जायले, शैलेश कडू व चालक पोहवा राजेश बहिरट यांनी पार पाडली

# मेळघाटच्या अतिदुर्गम कुटीदा गावात आज सीईओंचा मुक्काम



विदर्भ प्रजासत्ताक
दि.२३अमरावती

जिल्हा परिषदेच्या सीईओ संजीता महापात्र शुक्रवार, २३ मे रोजी मेळघाटच्या चिखलदरा तालुक्यातील हतरु आरोग्य केंद्रांतर्गतच्या कुटीदा या अतिदुर्गम गावात मुक्कामी राहणार आहेत. मेळघाटातील समस्या जाणून घेण्यासाठी एक दिवस थेट त्या गावात मुक्काम करायचा आणि दुसऱ्या दिवशी मान्सूनपूर्व उपाययोजना ठरवायच्या, यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने 'एक दिवस मेळघाटसाठी हा अभिनव उपक्रम राबवण्याचे ठरवले आहे. त्यानुसार सीईओंसह जिल्हाभरातील ३६ विभागप्रमुखही वेगवेगळ्या गावांमध्ये मुक्काम करणार आहेत.

जि. प. प्रशासनाने तयार केलेल्यावेळापत्रकानुसार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा डीआरडीएच्या प्रकल्प संचालक प्रिती देशमुख काटकुंभ आरोग्य केंद्रांतर्गतच्या बिच्चूखेडा येथे मुक्काम करतील, तर डेप्युटी सीईओ बाळासाहेब बायस हे सेमाडोह आरोग्य केंद्रांतर्गतच्या रेहट्याखेडा येथे मुक्कामाला जात असून बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता दिनेश गायकवाड हे हतरु आरोग्य केंद्रांतर्गतच्या कुही गावात थांबतील. लघुसिंचन विभागाचे कार्यकारी अभियंता सुनील जाधव हे सेमाडोह अंतर्गतच्या बोराट्याखेडा येथे मुक्कामी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. पुरुषोत्तम सोळंके हे काटकुंभ आरोग्य केंद्रांतर्गतच्या खडीमल येथे मुक्कामी राहतील.

# माधान ते देऊरवाडा येथे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रोडवरील अतिक्रमण धोकादायक

## अपघात झाल्यास जबाबदारी कोणाची?

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२३चांदूरबाजार




रस्ते अपघातात अनेक वेळा नागरिक यांना आपल्या जीव गमावे लागल्याचे अनेक प्रकार समोर आल्याचे दिसत आहे. मात्र सुरळीत रस्ता असला तरी रस्त्यावरील वाढलेल्या अतिक्रमामुळे अपघात होतो याकडे मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसत आहे. चांदूरबाजार तालुक्यातील माधान आणि देऊरवाडा गावात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रोडवर वाढलेल्या अतिक्रमणामुळे तसेच जागोजागी पडलेल्या खड्ड्यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता आहे. या संदर्भात सार्वजनिक विभागात अभियंता यांना वारंवार सांगून देखील सदर रस्त्याची दुरुस्त करण्यात आली नाही त्यामुळे या रोडवर अपघात झालाच त्या अपघाताची सर्वस्वी जबाबदारी नेमकी कोण घेणार हा प्रश्न आहे. रोड वरून जात असताना त्या रोडवर अतिक्रमण करू नये किंवा खड्डे खोदू नये नागरिकांचे प्राथमिकता असताना देखील नागरिक देखील याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे संबंधित विभाग बरोबर नागरिकांची तितकीच जबाबदारी जितकी त्या विभागाची. माधान बस स्टँड पासून देऊरवाडा रोडवर गावातून जाणारा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रोडवर वाहने उभे राहत आहे.त्याच बरोबर माधान गावात रोडवरच इलेक्ट्रिसिटी चा पोल असल्याने कधीही मोठे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.असाच काहीसा प्रकार विठ्ठल मंदिर ते देऊरवाडा येथील बस स्टँड पर्यंत पाहायला मिळतो रोडच्या दोन्ही बाजूला वाहने आणि बैलजोडी उभे राहत असल्याने रोड वरून वाहतूक करणारा वाहनांना या ठिकाणी अडचणीचा सामना करावा लागतो. त्यावर आता सार्वजनिक विभागाने पुढाकार घेऊन संबंधित वर कारवाई करणे आवश्यक आहे .किंवा अतिक्रमण मोकळे करणे गरजेचे आहे नाहीतर अपघात झाल्यास सार्वजनिक बांधकाम विभाग जबाबदार धरला जाईल असे मत सार्वजनिक बोलले जात आहे.

# शहराचे होत आहे विद्रुपीकरण नगरपरिषद प्रशासनाचे दुर्लक्ष

## मोर्शी शहरात धार्मिक स्थळावर जाहीरातीचे पोस्टर

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२३मोर्शी




शहरात होर्डिंग लावण्याची जणू काही स्पर्धा सुरू असून मुख्य ठिकाणी मोठमोठे बॅनर लावल्या जात आहे. यावर कोणत्याही अधिकाऱ्याचा वचक नाही. त्यातच भर म्हणून शहरातील एका शाळेतर्फे हजारो लोकांचे श्रद्धास्थान असलेल्या गणेश मंदिरावरच बॅनर लावून मोर्शी शहरासोबतच या धार्मिक स्थळाचेसुद्धा विद्रुपीकरण या बॅनरबाजी करणाऱ्या शाळेकडून केले आहे. यावर नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांनी ताबडतोब कारवाई करावी, अशी मागणी याप्रसंगी होत आहे.उच्च न्यायालयातर्फे शहरात पोस्टर लावण्यावर निर्बंध असल्यावरसुद्धा मोर्शी शहरात मोठ्या प्रमाणात बॅनरबाजी केल्या जात आहे. शहरातील जयस्तंभ चौकात शहरातील प्रसिद्ध गणेश मंदिर आहे. या ठिकाणी दररोज शेकडो भाविक दर्शनासाठी येतात. त्याचबरोबर बाहेरगावावरून येणाऱ्या नागरिकांचीसुद्धा या ठिकाणी गर्दी राहते. हे मंदिर भाविकांचे श्रद्धास्थान आहे; परंतु या मंदिराच्या दर्शनीय भागावरच एका शाळेने पोस्टर लावल्याने या मंदिराचे विद्रुपीकरण होत आहे. यावर मंदिराच्या पदाधिकाऱ्यांनी व नगरपरिषद प्रशासनाने कार्यवाही करणे गरजेचे आहे.

मोर्शी शहरात स्वतःला समाजसेवक समजणाऱ्या अगदी नवोदित समाजसेवकापासून ते मोठ्या नेत्यापर्यंत वाढदिवसाच्या मोठमोठ्या फ्लेक्स शहरात दर्शनीय भागात दिसून येते. यावर नगरपरिषदेची कोणती कारवाई होत नाही. त्यामुळे नगरपरिषदेचा लाखो रुपयांचा महसूलसुद्धा दरवर्षी बुडत आहे.मोर्शी शहरात बसस्थानकापासून रामजी बाबा मंदिर चौकापर्यंत मुख्य रस्त्यावरच अनेक फ्लेक्स लावल्या जात आहे. मोठमोठे होर्डिंग रस्त्याच्या कडेला लावल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे, तर शहराचे पूर्णतः विद्रुपीकरण होत आहे. याकडे मुख्याधिकारी यांनी लक्ष देऊन कार्यवाही करणे गरजेचे आहे.

# अंजनगावात आनंद मेला व्यवस्थापकाची दबंगगिरी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२३अंजनगाव सुर्जी



अंजनगाव सुर्जी शहरातील नगरपरीषद समोरील प्रांगणात स्वयंरोजगार खादी हॅण्डलूम क्रॉफ्ट व तात्पुरता ॲम्युझमेट पार्कमार्फत आनंद मेला सुरू आहे. या आनंद मेला व्यवस्थापकाला सुरक्षेच्या दृष्टीने विचारपूस केली असता त्याने थेट हातपाय तोडून जिवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी अंजनगाव सुर्जी पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे.

नगरपरिषद अंजनगाव सुर्जीचे मुख्याधिकारी यांनी काही शर्तीनुसार १ ते ३० मे या तीस दिवसांच्या कालावधी साठी न.प. समोरील मैदान आनंद मेला साठी दिले आहे. त्यामुळे शहरातील विद्यार्थ्यांचाव काही खेळाडू युवकांचा याला विरोध आहे. कारण या उन्हाळ्याच्या सुट्टीत काही युवक पोलिस भरती आणि सैनिक भरतीकरिता प्रांगणामध्ये सराव करत होते, तर काही शाळकरी मुले खेळण्याकरिता प्रांगणाचा उपयोग करत होते; परंतु अचानक नगरपरिषदेने हे प्रांगण भाडेतत्त्वावर दिल्यामुळे या सर्वांचा हिरमोड झाला. अशातच जगदीश शामराव तायडे यांनी मीना बाजार आयोजक व्यवस्थापक शेख रहेमान शेख मोहम्मद रा. पटेपुरा वर्धा यांना सुरक्षेबाबत विचारणा केली असता जगदीश तायडे यांना हातपाय तोडून जिवंत मारून टाकेल, अशी धमकी दिली. त्यामुळे तायडे यांनी अंजनगाव सुर्जी पोलिस स्टेशन, नगर परिषद, तहसीलदार यांना तक्रार केली आहे. तक्रार पोलिसस्टेशन अंजनगाव सुर्जी तहसीलदार, मुख्याधिकारी यांना केली असून यावर यांनी तत्काळ कार्यवाही करावी, अशी मागणी तक्रारकर्ते यांनी केली आहे.

अजुन पर्यंत तहसील कार्यालय मार्फत मेळावा आयोजकांना परवानगी दिली नसून नगर परीषद व पोलीस स्टेशन यांना पत्रदेणार आहे.

**पुष्पा सोळंके;**
**तहसीलदार**
**अंजनगाव सुर्जी**

# भक्तीधाम येथे बाल सुसंस्कार तथा भागवत धर्म प्रशिक्षण शिबिर

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२३चांदुर बाजार



चांदूरबाजार ज्ञानोदय विद्यानंदिर भक्तीधाम व संत श्री गुलाबराव महाराज सेवा संस्था बोराळा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बाल सुसंस्कार तथा भागवत धर्म प्रशिक्षण शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आहे असता सदर कार्यक्रमाची सांगता २० मे रोजी भक्तिधम संस्थेचे अध्यक्ष रवींद्र इंगोले यांच्या जाध्यक्षतेखाली पार पडली

याप्रसंगी कार्यक्रमाध्यक्ष म्हणून रठीद्र बाबुराव इंगोले अध्यक्ष गुलाबराव महाराज सेवा संस्था बोराळा तथा ज्ञानोदय विद्यामंदिर भक्तीधाम) हे उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून श्रीकांत पाटील। संचालक आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती), श्रीकांत भारतीय (आमदार विधानपरिषद), ह.भ.प. सचिन देव महाराज (अच्युत महाराज ट्रस्ट, अमरावती), ह.भ.प. देवेंद्र बुवाजी मारके (सुप्रसिद्ध कीर्तनकार तथा भागवत कथाकार),तुषार भारतीय (माजी सभापती महानगरपालिका अमरावती) उपस्थित होते.कार्यक्रम अध्यक्ष रवींद्र इंगोले यानी शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना दिलेले संस्कार विद्यार्थ्यांनी आपल्या घरीसुद्धा पालन करावे, असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले सुसंस्कार पिढी घालवण्यासाठी पाललानीसुद्धा मदत करावी, असे आवाहन उपस्थित पालकांना केले. सदर कार्यक्रनाला पंडितराव मोहोड, डॉ अरविंद देशमुख, बाबासाहेब लंगोटे, सुधाकर इंगोले, विनायक खांडे, श्रीधर मोहोड,सतीश मोहोड, सुरेश विधाते, दिनकर काळे, मनोहर कडू, केशवदादा ठाकरे, राजगुरु महाराज, ह.भ.प.आवारे महाराज, हभप श्रीकृष्ण ठोंबे, अशोक मुंदडा, सौ. महानंदा खांडे, संदीप भुयार व संस्थेचे पदाधिकारी मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन अनुराधा इंगोले, तसेच प्रास्ताविक श्रीकांत भुस्कटे यांनी केले, तर आभार प्रदर्शन मयुरी निंभोरकर यांनी केले. कार्यक्रमाची सांगता गवळण व पसायदान सादर करून करण्यात आली.

# पक्ष वाढवण्याच्या दृष्टीने कार्यकर्ता महत्त्वाचा – सुरेखा ठाकरे

## चांदूर बाजार येथे राकाँचे सदस्य नोंदणी अभियान

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२३चांदुर बाजार



पक्षवाढीच्या दृष्टीने कार्यकर्ता हा महत्त्वाचा असतो, असे प्रतिपादन चांदूर बाजार येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात झालेल्या पक्ष सदस्य नोंदणी अभियानाच्या उद्घाटनप्रसंगी राष्ट्रवादीच्या नेत्या ठाकरे यांनी केले आहे.

या अभियानाला राष्ट्रवादीच्या ज्येष्ठ नेत्या सुरेखा ठाकरे, अमरावती जिल्हा ग्रामीण जिल्हाध्यक्ष संतोष महात्मे, विदर्भ युवक अध्यक्ष निखिल ठाकरे, जिल्हा संघटन प्रमुख सईदभाई, युवक आघाडीचे जिल्हाध्यक्ष अंकुश घारड, अमरावती जिल्हा विद्यार्थी आघाडीचे अध्यक्ष अथर्व चुनडे, महिला कार्याध्यक्ष सरिता बोरकर, तालुकाध्यक्ष संजय गुर्जर, शहराध्यक्ष मोंटूभाई, गुड्डू पठाण, सरदार, दि. यू. पाटील, दिलीप पाटील धोंडे, दिलीप मेश्राम, राजेश बर्वे, प्रवीण भुजाडे, सुधीर महल्ले, अनिसभाई, सुमंत कांडलकर उपस्थित होते. कोणताही पक्ष म्हटला, की कार्यकर्ता महत्त्वाचा असतो. त्यामुळे पक्षाकडे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात असणे आवश्यक असते. त्यामुळे या सभासद नोंदणी अभियानात तालुक्यातील सर्व पदाधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात भाग घेऊन सदस्य संख्या वाढवावी, असे आवाहन सुरेखा ठाकरे यांनी केले. पदाधिकाऱ्यांमुळेच हे शक्य होते, असे जिल्हाध्यक्ष संतोष महात्मे यांनी स्पष्ट केले. दरम्यान सभासद संख्या वाढवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसने राज्यभर नोंदणी अभियान सुरू केल्याचे सांगत अधिकाधिक सदस्य वाढवण्याचे आवाहन केले.

बैठकीत आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांचाही आढावा घेण्यात आला. या वेळी जिल्हा कार्यकारिणीत उपाध्यक्ष पदावर सुमंत कांडलकर, सरचिटणीस श्रीकांत वानखडे यांची नियुक्ती केली. तसेच चांदूर बाजार तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागातील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. नवनियुक्त पदाघिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

# तक्रार शुन्य, अखंडित आणि गुणवत्तापूर्ण वीज पुरवठ्यासाठी परिमंडळात सहा कलमी कार्यक्रम

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२३अमरावती




महावितरणच्या अमरावती परिमंडळात वीज पुरवठ्यात गुणात्मक सुधारणा करून अखंडित व शाश्वत वीज पुरवठा, तक्रार शुन्य कार्यालय करण्यासाठी परिमंडळ कार्यालयांकडून सहा कलमी कार्यक्रम राबविण्यात येत असून त्यानुसार क्षेत्रिय कार्यालयाने कार्यवाही करावी असे निर्देश मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी दिले आहे.

अखंडित वीज पुरवठा, शुन्य अपघात, तक्रार शुन्य कार्यालय, वितरण हानी १५% पेक्षा कमी करणे, प्रलंबित वीज जोडण्याचा आकडा शुन्य करून मागेल त्याला तत्काळ वीज जोडणी देणे आणि विजबिलाची थकबाकी शुन्य करणे या सहा निकषांचा या सहा कलमी कार्यक्रमात समावेश करण्यात आला आहे.

मुख्य अभियंता यांनी परिमंडळात मागील दोन दिवसात वादळ वाऱ्यामुळे खंडित झालेला वीज पुरवठा आणि दुरूस्तीकार्याचा विभागनिहाय आढावा घेतला आणि आगामी १५ दिवसात देखभाल दुरूस्तीची कामे १००% पूर्ण झाली पाहिजे यादृष्टीने कामाला गती देण्याचे तसेच देखभाल दुरूस्तीचे काम करतांना वीज यंत्रणेशी संबंधित अपघात प्रवण स्थळावर काम करा, लोंबकळलेल्या वाहिन्या दुरूस्त करा, झाडाच्या फांद्या छाटा, तसेच वीजपोल/तान यामध्ये वीज प्रवाह उतरणार नाही त्यादृष्टीने नियोजनात्मक काम करून प्रत्येक कार्यालय प्रमुखाने आपले कार्यालय अपघात शुन्य कसे राहील यासाठी विशेष लक्ष देऊन काम करण्याचे निर्देश दिलेत.

ग्राहक हा महावितरणचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळे महावितरणने ऑनलाईन प्रणालीला प्राधान्य देत महावितरणच्या सर्व सेवा ह्या ऑनलाईन केल्या आहे. परंतू वीज जोडणी असोत किंवा ग्राहकाची वीज पुरवठा, बिलिंग आदीबाबत तक्रारीसाठी महावितरणमध्ये चकरा माराव्या लागतात, ते यापुढे बंद करण्याचे आणि शुन्य तक्रार' कार्यालय कसे करता येईल यासाठी काम करण्याचे त्यांनी सांगीतले.

तसेच वीज ही अत्यावश्यक सेवा आहे, त्यामुळे मागेल त्याला तत्काळ वीज जोडणी देण्याचे धोरणही महावितरणने स्विकारले आहे. परंतू तसे होतांना दिसत नाही, यापुढे हे खपवून घेतल्या जाणार नाही, पायाभूत सुविधा उपलब्ध असलेल्या ग्राहकांना तत्काळ वीज जोडणी देण्यावर भर द्यावा, ग्राहकाची अडवणूक झाली असल्यास कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल अश्या स्पष्टवजा सुचनाही मुख्य अभियंता यांनी दिल्या.

वितरण हानी कमी करण्यासाठी आणि सुरळीत वीज पुरवठ्याला अडथळा ठरणाऱ्या अनाधिकृत वीज वापरावर नियमित कारवाई करणे, आवश्यक त्या ठिकाणी पोलिस बंदोबस्तात कारवाई करणे. तसेच महावितरण ही वीज ग्राहकांप्रमाणेच एक ग्राहक आहे, हे ब्रीद वाक्य लक्षात ठेऊन वीजबिल वसुली १००% करणे हे या सहा कलमी उपक्रमाचे भाग आहे.

# आता औषध विसरा, 'एलईडी' दिव्यांच्या निळ्या प्रकाशात तणावमुक्त जीवनाचे गुपित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३नागपूर**

निरामय मानसिकता ही सुखाची वाट तर तणावमुक्त जीवन हे सुखाचे जन्मस्थान आहे. मात्र, आज धकाधकीच्या जीवनात प्रत्येकाला कुठलातरी ताण असतोच. हा ताण घालवण्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. संजय ढोबळे व मॉलिक्युलर बायोलॉजी विभागातील संशोधक व मानसोपचार समुपदेशक यजुर्वेद नरहरी सेलोकर यांनी 'एलईडी' दिव्यांच्या निळ्या प्रकाशाचा शोध लावला आहे. दिव्यांच्या निळ्या प्रकाशाखाली बसून तणावमुक्त होता येणार आहे.

डॉ. ढोबळे व यजुर्वेद सेलोकर यांनी नैराश्य, चिंता व हंगामी आजारावर उपाययोजना शोधत निळ्या रंगाच्या प्रकाशापासून उपचार घेण्यासाठी 'ब्ल्यू लाईट ल्युमडोम' नावाचे मॉडिल तयार केले आहे. कमी तरंग असणाऱ्या निळ्या प्रकाश तत्त्वावर या मॉडिलची निर्मिती करण्यात आली आहे. निळ्या रंगाच्या व कमी तीव्रतेच्या प्रकाशामध्ये २०-३० मिनिटे बसल्यानंतर तणाव, राग किंवा चिंता कमी होऊन चांगले वाटायला लागेल, असा संशोधकांचा दावा आहे. यासाठी काही दिवस नियमित उपचार घ्यावा लागणार आहे. यात शरीरावर कोणत्याही प्रकारचा वाईट परिणाम होणार नाही. तसेच आपल्या जीवनात परिवर्तन दिसण्यास सुरुवात होईल, असे डॉ. ढोबळे व यजुर्वेद सेलोकर या दोन्ही संशोधकांचे म्हणणे आहे. 'ब्ल्यू लाईट ल्युमडोम' या मॉडलेला नुकतेच आंतरराष्ट्रीय 'स्वामित्व हक्क' मिळाले आहे. मानवासाठी ही उत्तम 'लाईट थेरेपी' आहे, असे संशोधकांनी सांगितले. औषधमुक्त, सुरक्षित, नैसर्गिक व कमी खर्चामध्ये कमी वेळेत ही 'लाईट थेरेपी' जनतेसाठी कुठेही उपलब्ध होऊ शकते, हे विशेष.




**'हॅपी हार्मोन्स'च्या निर्मितीस चालना**

'ब्ल्यू लाईट ल्युमडोम' निर्मितीसाठी सहा निळ्या प्रकाशाची ४२५ ते ४८० एनएम या तरंगध्येयाचे पॅनल लाईट डोमच्यावर लावले गेले. जेणेकरून तो प्रकाश कमी तीव्रतेचा जाणवेल व डोळ्यावर सरळ येणार नाही. निळ्या रंगाच्या प्रकाशामध्ये २५-३० मिनिटे बसल्यानंतर मेंदूतील 'सेरोटोनिन' आणि 'डोपामिन' यासारख्या 'हॅपी हार्मोन्स'च्या निर्मितीस चालना मिळते. त्याचबरोबर झोपेचा दर्जा सुधारतो आणि नैराश्याची तीव्रता कमी होते. निळ्या रंगाच्या प्रकाशाच्या सान्निध्यात आल्यावर शांततेची अनुभूती होते व या रंगामुळे शरीर मनावर सकारात्मक परिणाम होतो. निळ्या रंगाच्या प्रकाशात बसणाऱ्याची रागाची व नैराश्याची तीव्रता कमी होऊन स्व:ऊर्जेची निर्मिती होते, उत्तम प्रकारचे विचार येता. यजुर्वेद सेलूकर यांनी मानसोपचार तज्ज्ञ म्हणून कार्य करून शांत जीवनासाठी हा उपाय शोधला आहे.

# मागील वर्षीच्या यूडायसवर मिळतो गणवेश निधी विद्यार्थी संख्या वाढली तर निधी पडतो अपुरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

पहीली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवशी गणवेश देण्यात येतो. आतापर्यंत तो कधीही वेळेत मिळाला नाही. मात्र, गणवेश निधी देताना मागील वर्षीच्या यूडायसच्या आधारे निधी मिळतो. नवीन वर्षात प्रवेश संख्या वाढली तर प्रवेशित विद्यार्थ्यांना गणवेश कोणत्या निधीतून द्यायचा, असा प्रश्न मुख्याध्यापकांना पडला आहे.या वर्षाला गणवेश खरेदीचा अधिकार शाळा व्यवस्थापण समितीला देण्यात आले आहे.आता प्रशासनाला शाळेच्या पहील्याच दिवशी दोन शालेय गणवेश,बुट,मोजे देण्याचा आग्रह सुरु झाला आहे.



समग्र शिक्षा अभियानांतर्गत राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवीच्या सर्व विद्यार्थ्यांना प्रती विद्यार्थी दोन गणवेश मोफत उपलब्ध करून दिले जातात. त्यासाठी शासनाकडून शाळा व्यवस्थापन समितीला प्रती विद्यार्थी, प्रती गणवेश ३०० रुपये प्रमाणे निधी देतात. त्यातही आता एक गणवेश स्काऊटगाईड पद्धतीचा देण्याची अट शासनाची आहे. त्यामुळे या गणवेशासाठी कापड व शिवण्यासाठी अधिक पैसे लागणार आहे. वाढत्या महागाईच्या काळात ३०० रुपयांत गणवेशाचे कापड व शिवण्याचा खर्च भागविणे शक्य होत नसल्याची भावना मुख्याध्यापक बोलून दाखवीत आहे.

महत्त्वाच्या म्हणजे मागील वर्षीच्या युडायसवर असलेल्या पटसंख्येच्या आधारे गणवेश निधी दिला जाते. नवीन वर्षांत पटसंख्या वाढली तर निधी अपुरा पडतो. मात्र सर्व विद्यार्थ्यांना गणवेश देणे आवश्यक अनेकदा मुख्याध्यापक व शिक्षकांना स्वतःच्या जवळून पैसा खर्च करावा लागतो. यामुळे शैक्षणिक क्षेत्रात रोष आहे.चालु शैक्षणिक सत्राच्या पटसंख्येवर आधारीत शाळांना गणवेश निधी मिळण्यात यावा.

**लहान-मोठ्यांच्या गणवेशासाठी सारखाच निधी**

पहिली व आठवीच्या विद्यार्थ्यांच्या गणवेशासाठी सारखाच निधी मिळतो. त्यातही सातवी, आठवीच्या विद्यार्थ्यांना मुलांना फुलपँट व मुलींना सलवार कमीज असा गणवेश द्यावा लागतो. त्यासाठी कापड व शिवणकाम खर्चही जास्त येतो. असे असताना लहान मोठ्यांसाठी सारखाच निधी उपलब्ध करून देणे ही बाब अनाकलनीय आहे.



**अनुदानात वाढ होणे गरजेचे २९**

वाढत्या महागाईमुळे कापडाचे भाव व शिवण्याचा दर लक्षात घेता ३०० रुपयात चांगला गणवेश तयार होत नाही, त्यातही स्काऊटगाईडचा गणवेश, ७वी, ८ वी च्या मुलांना फुलपँट, मुलींना सलवार कमीज यामुळे खर्च अधिक वाढतो त्यामुळे गणवेशाच्या निधीत वाढ होणे गरजेचे आहे. शासनाने किमान ५०० रुपये प्रती गणवेश प्रमाणे गणवेश निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी केली आहे.

# विद्यार्थ्यांसाठी २०० पानांचे लॉग आणि नोटबुक अर्ध्या किमतीत

## दिलीपभाई मंगलजीभाई पोपट यांची शिक्षणाची देणगी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ अमरावती**

२०२५-२६ चे शैक्षणिक सत्र सुरू होत आहे. आरोग्याप्रमाणेच शिक्षण क्षेत्रातही शक्य तितके योगदान दिले पाहिजे. या पवित्र विचाराने श्याम चौकातील रघुवीर मिठाईचे संचालक दिलीपभाई मंगलजीभाई पोपट हे गरीब,होतकरू विद्यार्थ्यांना २०० पानी लॉगबुक व नोटबुक केवळ अर्ध्या किमतीत देत आहेत.या शैक्षणिक भेटीबाबत माहिती देताना दिलीपभाई पोपट म्हणाले की, मागील वर्षीही हा शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आला होता, त्यामध्ये १० हजार नोट बुक वितरित करण्यात आले होते.

या वर्षी ही हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. श्याम चौकातील रघुवीर मिठाई येथील गरजू विद्यार्थ्यांसाठी निम्मी किंमती मध्ये लॉंग बुक व नोट बुक उपलब्ध आहे

दुपारी१ ते ४ श्याम चौक येथील रघुवीर मिठाई आणि बडनेरा रोड येथील भक्तीधाम मंदिरात सकाळी ९ ते ९ या वेळेत उपलब्ध करून देण्यात आले आहे.दिलीपभाई पोपट यांनी सांगितले की, लॉगबुक व रजिस्टरसाठी संबंधित विद्यार्थ्यांचे शालेय ओळखपत्र आवश्यक आहे. एका विद्यार्थ्याला डझनभर नोट बुक दिली जात आहेत.

**आरोग्याबरोबरच शिक्षण क्षेत्रात सेवा**

दिलीपभाई पोपट म्हणाले की, पोपट कुटुंबीयांनी त्यांच्या क्षमतेनुसार आरोग्य क्षेत्रात ज्या पद्धतीने मदत केली, त्याच पद्धतीने शिक्षण क्षेत्रातही पाठबळ मिळावे या उद्देशाने विद्यार्थ्यांना नोटबुक आणि लॉगबुक देण्याचा उपक्रम गेल्या वर्षी सुरू केला.

# साईनगर परिसरामध्ये विजेचा लपंडाव सुरु

## १० दिवसात वीज पुरवठा सुरळीत केला नाही तर आंदोलनाचा इशारा - तुषार भारतीय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

अमरावती शहरातील साईनगर परिसरात विजेचा लपंडाव सुरु आहे. सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरु असून उकाड्याने नागरिक त्रस्त आहेत. त्यातच कधी दिवसा, तर कधी रात्री अचानक वीज गायब होत आहे. वीज पुरवठा सुरळीत होत नसल्याने नागरिकांतून नाराजी व्यक्त होत आहे. याबाबत मनपा माजी स्थायी समिती माजी सभापती तुषार भारतीय व माजी महापौर चेतन गावंडे यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता श्री संजय सराटे यांच्याकडे निवेदन देत वीज पुरवठा पुर्ण क्षमतेने करून सुरळीत करावा, अशी मागणी केली आहे.



साईनगर परिसर हा कॉलनी व सोसायटी बहुल भाग आहे. या परिसरात घरुन काम वर्क फ्रॉम होम करणाऱ्यांची संख्या जास्त असून सध्या विद्यार्थ्यांच्या परिक्षा देखील सुरु आहेत. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने प्रचंड उष्णता वाढली आहे. परिसरातील दिवसा रात्री-अपरात्री नेहमीच लाईट जाण्याचा प्रमाण वाढले आहे. उकाड्यामुळे नागरिकांचे बेहाल आहेत.साईनगर प्रभागचा विस्तार दिवसेंदिवस वाढत जात असल्यामुळे व परिसरात काळी मातीचे प्रमाण जास्त असल्यामुळे दोन पोलचे अंतर जात असते अन काळ्या मातीमुळे पोल वाकतात त्यामुळे वायर खाली लटकतात , अश्यावेळी कोणतीही दुर्घटना होऊ शकते . नवाथे सेंटर परिसर हा मोठ्या असल्यामुळे कर्मचारी सुद्धा कमी आहे. रात्रीच्या वेळी तर या सेंटरवर कोणीच कर्मचारी नसल्यामुळे अनेकदा अंधारात रात्र काढावी लागते .

# वनपरिक्षेत्र अधिकारी बदलीतील घोडेबाजार रोखा : वॉर संस्थेची मुंबई मंत्रालयातील वन सचिवाकंडे तक्रार-ऑडिओ क्लिपने वन वर्तुळात खळबळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती :**


वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या बदलीसंदर्भात काही समाज माध्यमांवर एक वन परिक्षेत्र अधिकारी व इतर एक इसम यांच्यात झालेल्या संभाषणाची एक ऑडिओ क्लिप वायरल झालेले आहे. या क्लिपमध्ये सदर आरएफ ओ इच्छूक पद मिळविण्यासाठी २५ लक्ष रुपये देण्यास तयार असल्याचे सांगत आहे. परंतु ते पद ५० लाखात विकल्या गेल्याने माझे काम होणार नसल्याचे सांगत आहे. यावरून सध्या वन विभागात वरिष्ठ अधिकाऱ्यांचे बदलीवाबत मोठ्या प्रमाणावर घोडेबाजार सुरु असल्याचे चित्र दिसत आहे. यासंदर्भातील तक्रार वाईल्ड लाईफ अवेअरनेस रिसर्च अॅड रेस्क्यू वेल्फेअर सोसायटी (वॉर) चे अध्यक्ष नीलेश कंचनपुरे यांनी मुंबई मंत्रालयातील वनसचिवाकडे केली असून, हा घोडो बाजार थांबविण्यात यावी, अशी मागणी केली आहे. सोशल मिडियावर व्हायरल झालेल्या या ऑडिओ क्लिपमध्ये एक आरएफओ एका व्यक्तीसोबत बदलीसंदर्भात चर्चा करताना दिसत आहे. यामध्ये बदलीसाठी २५ लाखाशिवाय काम होत नाही, असे त्या संभाषणातून दिसून येत आहे. बदली प्रक्रियेच्या अनुषगाने वन अधिकारी रजा न काढता आणि वरिष्ठांची परवानगी न घेता मंत्रालयात फेऱ्या मारत आहेत. त्यामुळे मंत्रालयात तयार करण्यात आलेल्या तात्पुरत्या ओळखपत्र आणि मोबाईल रेकॉर्ड तपासल्यास ही बाब स्पष्ट होईल. अशा पद्धतीने बदल्या झाल्यास वन आणि वन्य जीव यांचे संरक्षण व संवर्धन कामे न करता भ्रष्टाचार वाढीस लागेल. सदर संभाषणाची सखोल चौकशी करून मंत्रालयातील संबंधित कक्ष अधिकारी आणि उपसचिव आणि इतर दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. अषी मागणी वॉर संस्थेचे अध्यक्ष निलेश कंचनपूरे यानी केली आहे.

# 'अपार आयडी' असेल तर दहावी, बारावीचा मार्कमेमो डिजिलॉकरवर

## विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नोंदी ठेवण्यासाठी होतो वापर : भविष्यात होणार अधिक वापर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

अपार आयडी' मिळालेला असेल तर विद्यार्थ्यांना दहावी-बारावीचे गुणपत्रक डिजिलॉकरवर उपलब्ध होणार आहे. जर तुमच्याकडे 'अपार आयडी' असेल, तर तुम्ही तुमची दहावी आणि बारावीची मार्कशीट (मार्कमेमो) डिजिलॉकरवर डाउनलोड करू शकता. अपार आयडी एक डिजिटल ओळखपत्र आहे, जे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नोंदी डिजिटल स्वरूपात ठेवण्यासाठी वापरले जाते. डिजिलॉकरवर गुणपत्रिका देणारे देशातील पहिले राज्य ओडिशा आहे. ओडिशा सरकारने नागरिकांना डिजिलॉकरमध्ये कागदपत्रांचे रेकॉर्ड जतन करण्यासाठी प्रोत्साहित केले आहे.'अपार आयडी' वापरून लॉगिन करा. अपार आयडीची नोंदणी करण्यासाठी, ररिरी शर्वीलरींळेप.सीं.ळप या संकेतस्थळाला भेट द्या. अपार आयडी पोर्टलद्वारे तयार केला जातो.डिजिलॉकरच्या वेबसाइट किंवा ॲपवर जा. साइन अप करा आणि आवश्यक माहिती भरा.




**डिजिलॉकरमध्ये मार्कमेमो कसा डाउनलोड करणार?**

डिजिलॉकरमध्ये, तुमच्या अपार आयडीशी संबंधित कागदपत्रे दिसतील. दहावी, बारावीच्या मार्कशीट सर्च करा. मार्कशीट डाउनलोड करा. डिजिलॉकरवर मार्कशीट डाऊनलोड करण्यासाठी, तुमच्याकडे अपार आयडी असणे आवश्यक आहे. डिजिलॉकरवर लॉगिन करण्यासाठी, तुमचा आधार कार्ड नंबर किंवा मोबाइल नंबर वापरू शकता.

**डिजिटल इंडिया'चा भाग; डिजिलॉकर पूर्णतः सुरक्षित**

१) अपार कार्ड बनवण्यासाठी विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड असणे आवश्यक आहे. त्याचे डिजिलॉकरवर खाते असावे, त्याआधारे विद्यार्थ्यांची केवायसी प्रक्रिया पूर्ण केली जाईल.

२)नोंदणीनंतर संबंधित शाळा आणि महाविद्यालयांकडून अपार कार्ड दिले जाईल. त्यासाठी पालकांची संमती घेतली जाणार आहे. ही एक अशी प्रणाली आहे. यात विद्यार्थ्यांचा शैक्षणिक तपशील आणि इतर नोंदी केल्या जातील. यामुळे भविष्यात विद्यार्थ्यांना कागदपत्र सोबत बाळगण्याची गरज नाही. केव्हाची लागेल तेव्हा ते या लॉकरमधून कागदपत्रे बघू शकणार आहे.

